नूतन वर्षाभिनंदन 2024

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. MAHMAR 2023/84526




❑ वर्ष - १ ❑ अंक -२७० ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## नववर्षाच्या सुरुवातीलाच जपानमध्ये भीषण भूकंप, तीव्र धक्क्यांनंतर त्सुनामीचाही इशारा

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक इशिकावा**

नववर्षाच्या सुरुवातीलाच जपानभूकंपाच्या तीव्र धक्क्यांनी हादरले असून, या भूकंपाच्या धक्क्यांनंतर मोठ्या लाटा उसळल्याने त्सुनामीचाही इशारा देण्यात आला आहे. पश्चिम जपानमध्ये आलेल्या भूकंपाची तीव्रता ७.४ मॅग्निट्युट एवढी नोंदवली गेली आहे. या भूकंपानंतर त्सुनामी येण्याची भीतीही वर्तवण्यात येत आहे.

जपानमधील हवामान संस्थेने सांगितले की, इशिकावा आणि जवळचा परिसर भूकंपाच्या या तीव्र धक्क्यांनी हादरला आहे. तसेच या भूकंपाची तीव्रता ७.४ मॅग्निट्चुट इतकी असल्याची माहिती काही प्रसारमाध्यमांनी दिली आहे.



नववर्षाच्या सुरुवातीलाच जपानभूकंपाच्या तीव्र धक्क्यांनी हादरले असून, या भूकंपाच्या धक्क्यांनंतर मोठ्या लाटा उसळल्याने त्सुनामीचाही इशारा देण्यात आला आहे. पश्चिम जपानमध्ये आलेल्या भूकंपाची तीव्रता ७.४ मॅग्निट्युट एवढी नोंदवली गेली आहे. या भूकंपानंतर त्सुनामी येण्याची भीतीही वर्तवण्यात येत आहे.

जपानमधील हवामान संस्थेने सांगितले की, इशिकावा आणि जवळचा परिसर भूकंपाच्या या तीव्र धक्क्यांनी हादरला आहे. तसेच या भूकंपाची तीव्रता ७.४ मॅग्निट्चुट इतकी असल्याची माहिती काही प्रसारमाध्यमांनी दिली आहे.

या भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा देण्यात आला आहे. त्सुनामीमुळे ५ मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी किनारी भाग सोडून इमारतींच्या वरच्या भागात किंवा उंच ठिकाणी आश्रय घ्यावा. असं आवाहन जपानमधील सरकारी वृत्तवाहिनी असलेल्या एनएचकेवरून करण्यात आलं आहे.

शेकडो बेटांवर वसलेल्या जपानचा संपूर्ण भाग हा भूकंपप्रवण क्षेत्रात येतो. तसेच येथील महासागरामध्ये होणाऱ्या भूकंपांमुळे येथील किनाऱ्यांवर त्सुनामीच्या लाटाही धडकत असतात. दरम्यान, २०११ मध्ये मार्च महिन्यात आलेल्या त्सुनामीमुळे जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाली होती. तसेच त्सुनामीमुळे फुकुशिमा अणुऊर्जा केंद्रात पाणी शिरून किरणोत्साराचा धोका निर्माण झाला होता.

## स्वागत २०२४ नववर्षाचे!!...



**न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये नवे वर्ष सर्वप्रथम सुरू होते. ऑस्ट्रेलियातील सिडनी शहरातील सुप्रसिद्ध ऑपेरा हाऊसजवळ फटाक्यांच्या आतषबाजीने २०२४चे जोरदार स्वागत करण्यात आले. ही रोषणाई पाहण्यासाठी हजारो नागरिक जमा झाले होते.**

## मित्र पक्षांना न दुखावता लोकसभेसाठी काँग्रेसकडून एकाचवेळी दोन मेगा प्लॅन तयार; काय आहे रणनीती?



**दि.१विदर्भ प्रजसत्ताक नवी दिल्ली**

राम मंदिर सोहळ्याच्या आडून भाजपने लोकसभेसाठी रणशिंग फुंकले असतानाच आता काँग्रेसनेही एकाचवेळी दोन मेगा प्लॅन करत तयारीसाठी शड्डू ठोकला आहे. इंडिया आघाडीमधील मित्रपक्षांना न दुखावता काँग्रेसकडून तयारी सुरु करण्यात आली आहे. काँग्रेसकडून आगामी लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यामध्ये २०१९ लोकसभा निवडणुकीमध्ये जिंकलेल्या ५२ लोकसभा मतदारसंघांवर लक्ष केंद्रित केलं आहे. तसेच २०१९ मध्ये दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या २०९ लोकसभा मतरदारसंघांसह एकूण २६१ मतदार संघात काँग्रेसने थेट लक्ष केंद्रित केले आहे. पक्षांतर्गत सर्वे तसेच वेगवेगळ्या प्रकारे मित्रपक्षांना न दुखावता उमेदवारांची चाचपणी सुरु करण्यात आली आहे.

दुसऱ्या टप्प्यामध्ये आठ राज्यात प्रादेशिक पक्ष प्रभावी नसल्याने काँग्रेसची थेट लढत भाजपशी आहे. यामध्ये मध्य प्रदेश, राज्यस्थान, गुजरात, छत्तीसगड, उत्तराखंड, हिमाचल, कर्नाटक व आसाम राज्यांचा सहभाग आहे. या राज्यातील १४२ लोकसभेच्या जागा येतात. सध्या याठिकाणी भाजपचे १३० खासदार आहेत. तुलनेत काँग्रेसकडे फक्त ७ खासदार आहेत. त्यामुळे या आठ राज्यांमध्ये १०० प्लस लोकसभा जागा जिंकण्यासाठी प्रयत्न काँग्रेस करणार आहे.

**पक्ष २९१ जागांवर स्वबळावर निवडणूक लढवणार**

दुसरीकडे, लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीमधील जागा वाटप करण्यापूर्वी, काँग्रेसच्या राष्ट्रीय आघाडी समितीने २९ आणि ३० डिसेंबर रोजी मॅरेथॉन विचारमंथन सत्र आयोजित केले होते. यामध्ये पक्षाने १० राज्यांतील प्रदेशाध्यक्ष आणि विधिमंडळ पक्षाच्या नेत्यांना सांगितले की, पक्ष २९१ जागांवर स्वबळावर निवडणूक लढवणार आहे. काँग्रेस इंडिया आघाडीकडून ८५ जागांची मागणी करणार आहे. लोकसभेचे चित्र लक्षात घेऊन इंडिया आघाडी जागावाटपाचा अंतिम निर्णय घेतला जाईल.

**१४ जानेवारीपूर्वी जागा वाटप**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे याच आठवड्यात इंडिया आघाडीच्या उर्वरित नेत्यांशी चर्चेसाठी आपला प्रतिनिधी ठरवतील. राष्ट्रीय समिती आपला अहवाल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना सादर करणार आहे. खरगे यांनी ४ जानेवारीला प्रदेश काँग्रेस अध्यक्ष आणि विधिमंडळ पक्षनेत्यांची बैठक बोलावली आहे. पक्षाच्या निवडणूक जाहीरनामा समितीची बैठकही त्याच दिवशी होणार आहे. १४ जानेवारीपासून राहुल गांधींच्या भारत न्याय यात्रेपूर्वी जागांचे वाटप केले जाईल.

## 'केंद्र व राज्य सरकारला आरक्षण देण्याची सद्बुद्धी द्यावी..' जरांगे पाटलांचे प्रभू श्रीरामाला साकडे

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

आम्ही कट्टर हिंदू आहोत. अमूकच तारीख का निवडली, याचा आणि राम मंदिर लोकार्पणाचा काही संबंध नाही. मुंबईत मुद्दामहून १८ तारखेपर्यंत जमावबंदी लागू केली. त्यामुळे आम्ही २० तारीख निवडली. अयोध्येत राम मंदिर होत आहे, याचा आम्हालाही तितकाच आनंद आहे. आम्ही मुंबईत आनंद व्यक्त करू, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी राम मंदिराचे लोकार्पण केले जाणार आहे. मात्र, नेमकी हीच वेळ मनोज जरांगे यांनी मुंबईकडे कूच करण्यासाठी निवडली, असा आरोप केला जात आहे. यावर मनोज जरांगे यांनी स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडली.

मीडियाशी बोलताना, छत्रपती शिवरायांच्या काळात जास्त महत्व ध्येय आणि विचारांना दिले जात होते. त्याचप्रमाणे आमचे ध्येय आणि सूत्र ठरले आहे. गोरगरीब मराठ्यांच्या ध्येयांसाठी



आम्ही काम करतो आहे, असे सांगत मनोज जरांगे यांनी नववर्षाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, देव मनात असायला हवा. सगळे तिथे पोहोचू शकत नाही. सामान्य शेतकरी शेतातून राम-राम म्हणतो. एकमेकांना भेटल्यावर राम-राम म्हणतो. राम मंदिराचे काम अर्धवट झाले आहे, तरी तुम्ही तीच तारीख का निवडली, अशी शंका आम्ही कधी उपस्थित केली नाही. श्रीरामावर तुमच्यापेक्षा आमची जास्त आस्था आहे. २० तारखेला सगळा मराठा पायी चालण्यास सुरुवात करेल, तेव्हा २२ तारखेला सगळेच जण राम मंदिराच्या लोकार्पणाचा आनंद व्यक्त करणार आहेत. आम्हीही त्या आनंदात सहभागी आहोत. गेल्या चार महिन्यांपासून आमचे आंदोलन सुरू आहे. विविध टप्प्यांवर आंदोलन सुरू आहे. सरकारशी चर्चा सुरू आहे, असे मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले.

**मनोज जरांगे पाटील अयोध्येत जाऊन श्रीरामांचे दर्शन घेणार का?**

अयोध्येत जाण्याबाबत मनोज जरांगे यांना प्रयत्न विचारण्यात आला. यावर सकारात्मक उत्तर देत, श्रीरामांनी सरकारला सुबुद्धी द्यावी. श्रीरामांच्या चरणी आमची विनंती आहे, साकडे आहे की, केंद्रापासून राज्य सरकारपर्यंत सर्वांना सद्बुद्धी द्यावी. २० तारखेच्या आत आम्हाला आरक्षण द्या. मग मराठे मोकळे झाले, तिकडे यायला. मग काही अडचण नाही. मनोज जरांगेसह सगळे मराठे अयोध्येत दर्शनासाठी जातील. पण काही झाले तरी आरक्षण सोडणार नाही, असे मनोज जरांगे यांनी सांगितले.दरम्यान, आम्ही ठरवले आहे आता महाराष्ट्रातील सगळ्या मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण घेणार. आमचा जीव गेला तरीही मुंबईचे आंदोलन होणारच. लाठीचार्जमध्ये हात-पाय मोडले गेले. मी ते काहीही विसरलो नाही. आंतरवाली सराटीच्या लाठीचार्जची आठवण आली की आजही माझ्या अंगावर काटा येतो. त्या किंकाळ्या इतक्या होत्या की गाव हादरले होते. मोठा आवाज, रक्ताने माखलेली जागा, धूर, लाठीचार्ज, माता माऊलींच्या किंकाळ्या, अमानुष लाठीचार्ज ही घटना आठवली की सरकारचे तोंडही पाहू नये असे वाटते. पण आता गाव त्याच ताकदीने पेटून उठले आहे. जे रक्त सांडले त्याचे बळ निर्माण झाले आहे. तो विषय काढण्यासारखा नाही. ज्या मातामाऊलींचे रक्त सांडले आहे ते वाया जाऊ देणार नाही. या समाजासाठी मरेपर्यंत गद्दारी करणार नाही, असे मनोज जरांगे म्हणाले.

## २२ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी जाहीर करा, भाजप आमदाराची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राम मंदिराच्या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमांना सर्वांना उपस्थित राहता यावे, यासाठी सार्वजनिक सुट्टी आवश्यक आहे. खासगी आस्थापनांना आवश्यक ते निर्देश द्यावेत, असं अतुल भातखळकर यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.शतकानुशतकांच्या संघर्षानंतर प्रभू श्री राम जन्मभूमी आयोध्येमध्ये उभारण्यात




आलेल्या भव्य अशा श्री राम मंदिरात सोमवार, २२ जानेवारी रोजी रामलला विराजमान होणार आहेत. सर्वच भारतीयांसाठी हा महत्वाचा आणि अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. त्या दिवशी सर्वत्र दिवाळी साजरी होणार आहे. या सोहळ्यात नागरिकांना सहभागी होता यावे, त्याचे साक्षीदार होता यावे, यासाठी २२ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी अतुल भातखळकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

या मागणीचे पत्र आमदार भातखळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे. २२ जानेवारी हा दिवस भारताच्या इतिहासातील ऐतिहासिक दिवस ठरणार आहे. सुमारे ५००-५५० वर्षांचा संघर्ष या प्रभू राम मंदिर उभारणीसाठी करण्यात आला आहे. शेकडो राम भक्तांनी यामध्ये आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात हे मंदिर उभारणीचे काम झाले आहे. प्रभू श्री राम मंदिरात विराजमान होणार या दिवसाची तमाम राम भक्तांना प्रतीक्षा आहे.त्या दिवशी घरोघरी दिवे लावून दिवाळी साजरी करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

## नवीन मोटार वाहन कायद्याविरोधात राज्यभरात आंदोलन : कुठे चक्का जाम, तर कुठे टायर पेटवले

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

केंद्र सरकारने आणलेल्या नवीन मोटार वाहन कायद्याला मोठ्या प्रमाणात विरोध होतांना पाहायला मिळत आहे. राज्यभरात आज सकाळपासून ठिकठिकाणी ट्रकचालक रस्त्यावर उतरून आंदोलन करतांना पाहायला मिळत आहे. कुठे चक्का जाम केला जात आहे, तर कुठे टायर पेटवले जात आहे. त्यामुळे अनेक महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. केंद्र सरकारने आणलेल्या नवीन वाहन कायद्यानुसार यापुढे अपघातास जबाबदार ट्रकचालकास दहा वर्षांच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. सोबतच सात लाख रुपये दंड देखील आकाराला जाणार आहे. दरम्यान याच कायद्याला देशभरात विरोध होत असून, ट्रकचालक थेट रस्त्यावर उतरले आहेत.

**नागपूरमध्ये चक्काजाम**

नागपूर-भंडारा राष्ट्रीय महामार्गावर ट्रक चालकांनी चक्काजाम आंदोलन सुरू केले आहे. अपघातानंतर जखमींना मदत न करता पळून जाणाऱ्या वाहन चालकांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, या केंद्र सरकारच्या नव्या निर्णयाच्या विरोधात ट्रकचालक हे चक्काजाम आंदोलन करत आहेत. या कायद्यात वाहन चालक खास करून ट्रक चालकांविरोधात एकतर्फी कारवाईची तरतूद करण्यात आली असल्याचा आरोप होत आहे. अपघाताच्या स्थळावर थांबल्यावर चूक



नसतांना देखील लोक ट्रकचालकाला मारहाण करतात. त्यामुळे आपला जीव वाचवण्यासाठी ट्रकचालक पळून जातात. मात्र, नंतर ते पोलिसांकडे जाऊन माहिती देतात. त्यामुळे हा कायदा वाहन चालकांच्या विरोधात असल्याची प्रतिक्रिया देत ट्रकचालकांनी चक्काजाम आंदोलन सुरू केले आहे. याचवेळी नागपूरच्या चौदा मैल येथे ट्रकचालकांनी कोलकत्ता-नागपूर- मुंबई व नागपूर- भोपाळ राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला आहे.

**गोंदियात टायर जाळून केंद्र सरकारचा निषेध**

केंद्र सरकारने आणलेल्या नवीन मोटार वाहन कायद्यानुसार यापुढे अपघातास जबाबदार ट्रकचालकास १० वर्षांच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. सोबतच सात लाख रुपये दंड देखील आकाराला जाणार आहे. दरम्यान, याच कायद्याला देशभरात विरोध होत असून, चालकांनी थेट संपाची हाक दिली आहे. याचे अनुषंगाने गोंदिया शहरातील कुडवा चौक येथे आज नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच टायर जाळून केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला. यावेळी वाहतूक विस्कळीत होऊ नये यासाठी रामनगर पोलिसांनी १३ चालकांना ताब्यात घेतले आहे.

**बुलढाण्यात टायर जाळून महामार्ग अडवला**

बुलढाणा जिल्ह्यात देखील ट्रक चालक आक्रमक होतांना पाहायला मिळत आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावर मलकापूर-घोडसगाव नजिक रस्त्यावर टायर जाळून महामार्ग अडवण्यात आला आहे. गेल्या एक तासांपासून महामार्ग अडवून वाहन चालकांची घोषणाबाजी सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. अपघात झाल्यानंतर पळून जाणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याच्या नवीन नियमाला वाहन चालकांनी यावेळी विरोध केला आहे. या आंदोलनामुळे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या असून, पोलिस आंदोलनस्थळी पोहचले आहेत.

**आंदोलनाचे पडसाद छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात देखील या आंदोलनाचे पडसाद उमटताना पाहायला मिळत आहे.

## संपादकीय ......

# राहुल यांची आता 'भारत न्याय यात्रा'

*भारत जोडो यात्रेच्या यशानंतर राहुल गांधी आता 'भारत न्याय यात्रा' काढणार आहेत. या यात्रेला मणिपूर राज्यापासून सुरुवात होणार असून ती महाराष्ट्रात संपणार आहे. १४ जानेवारी ते २० मार्च या कालावधीत ही यात्रा होईल. लोकसभेच्या जास्त जागा असलेल्या अनेक राज्यांमधून ही यात्रा जाणार आहे. यात्रेचा मार्ग आखताना लोकसभेच्या ३५५ जागांचा परिसर 'यात्रे'द्वारे फिरला जाणार आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी या यात्रेला म्हणूनच काँग्रेसच्या दृष्टिकोनातून महत्त्व असणार आहे. ही यात्रा काँग्रेसच्या बळकटीकरणासाठीच काढली जात आहे.*

*राहुल गांधींची ही यात्रा ज्या राज्यांतून जाणार आहे, त्यापैकी ईशान्य भारत वगळता बहुतांश राज्ये अशी आहेत जेथे इंडिया आघाडीतील जागांच्या समन्वयाबाबत गंभीर समस्या आहेत किंवा अशा समस्या येण्याची शक्यता आहे. यामध्ये बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश व अगदी महाराष्ट्राचाही समावेश होतो. यात्रेनिमित्त संबंधित भागात काँग्रेसला आपला दावा पक्का करता येणार आहे. काही दिवसांपूर्वीच झालेल्या पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसची कमी झालेली 'पॉवर' दिसून आलीच; त्यामुळे इंडिया आघाडीतील काँग्रेसची पॉवरही कमी झाली.*

*'भारत न्याय यात्रा' ज्या ३५५ लोकसभा मतदारसंघांतून जाणार आहे त्यापैकी ९२ मतदारसंघ हे एससी आणि एसटी प्रवर्गासाठी राखीव आहेत. दलित आणि आदिवासी मतदार हे नेहमीच काँग्रेसच्या सोबत राहिले आहेत, पण नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांच्या निवडणुकीत काँग्रेसचा हा मतदार भाजपकडे स्थलांतरित झाला असल्याचे दिसते. त्यामुळे असे स्थलांतरण रोखण्यासाठी 'भारत न्याय यात्रे'चा उपयोग होऊ शकतो. याआधीची भारत जोडो यात्रा कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान या राज्यांतून गेली होती. या राज्यांत नुकतीच विधानसभा निवडणूक झाली. कर्नाटक, तेलंगणा या राज्यांत काँग्रेसला या यात्रेचा फायदा झाला, मात्र राजस्थान, मध्य प्रदेश यांसारख्या हिंदी पट्ट्यातील राज्यांत मात्र काँग्रेसला फायदा झाला नाही. गुजरात, उत्तर प्रदेश या राज्यांतून भारत जोडो यात्रा गेली नव्हती.*

*भारत न्याय यात्रेच्या माध्यमातून राहुल गांधींच्या नेतृत्वावरही शिक्कामोर्तब होणार आहे. काही दिवसांपूर्वी इंडिया आघाडीच्या बैठकीत पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून ममता बॅनर्जी यांनी मल्लिकार्जुन खर्गे यांचे नाव सुचवले होते. या नावाला आपचे अरविंद केजरीवाल यांनीही समर्थन दिले. भाजपला हरवायचे असेल तर 'आऊट ऑफ द बॉक्स' जाऊन विचार करावा लागेल, असे ममता बॅनर्जी आणि केजरीवाल यांचे मत आहे. यातूनच खर्गे यांचे नाव पुढे आले, परंतु खर्गे यांनी पंतप्रधानपदाच्या उमेदवारीबाबत सबुरीने घेण्याचा सल्ला दिला. असे असले तरी राहुल यांना पर्याय शोधण्याचा जो प्रयत्न सुरू आहे तो भारत न्याय यात्रेनंतर संपेल, असा विश्वास काँग्रेसच्या नेत्यांना वाटत असावा.*

*भारत न्याय यात्रा येत्या १४ जानेवारीला सुरू होईल. तिचा २० मार्चला समारोप असला तरी फेब्रुवारी महिन्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यावेळी यात्रा थांबवण्याशिवाय काँग्रेसकडे पर्याय नसेल. याच काळात राहुल गांधी यांच्या देशभर सभाही होतील. त्यामुळे भारत न्याय यात्रा काही दिवसांपुरतीच असेल असा अंदाज आहे. अर्थात अयोध्येतील राम मंदिराच्या लोकार्पणामुळे सर्वच माध्यमांचा आणि नागरिकांचाही फोकस तिकडेच असेल. हा फोकस बदलण्यासाठी 'भारत न्याय यात्रे'चे औचित्य असेल. काँग्रेस यामध्ये किती यशस्वी होईल हे आगामी काळातच समजेल.*

# न्यू हायस्कूल मेन येथे शताब्दी समारोह निमित्त शिक्षक सभा संपन्न



**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – न्यु हायस्कूल मेन शाळेच्या प्रांगणात नुकतीच न्यू हायस्कूल मेन ,महिला महाविद्यालय, नूतन कन्या शाळा व न्यू हायस्कूल बेलपुरा या शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांची सभा आयोजित करण्यात आली होती. येणाऱ्या २०२४ या वर्षात न्यू हायस्कूल मेन या शाळेला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत हा भाग्यकारक ऐतिहासिक क्षण वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांनी साजरा करण्यासाठी, नूतन विदर्भ शिक्षण मंडळाची कार्यकारणी कामाला लागली आहे. अभिनव असे उपक्रम राबविण्यासाठी व ते सर्व आजी व माजी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी, सर्व कर्मचाऱ्यांना उपक्रमाची माहिती देण्यासाठी, या सभेचे आयोजन करण्यात आले होते .शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. जदबन्सी मॅडम, यांनी विद्यमान कार्यकारणीच्या पुढाकाराने आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा आपल्या प्रास्ताविकात मांडली. सभेला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, श्री अविनाश देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती .सभेला संबोधताना शालेय जीवनातील सुवर्णकाळाची त्यांनी उजळणी केली. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शाळेच्या शताब्दी समारोहा मध्ये सहभागी होण्यासाठी व शाळेच्या आधुनिकीकरणासाठी आम्ही सर्व माजी विद्यार्थी कटिबद्ध आहोत ,या गोष्टीचा पुनरुच्चार श्री देशपांडे यांनी आपल्या भाषणातून केला. शाळेच्या माजी मुख्याध्यापिका, सौ पुरोहित मॅडम यांनी सर्व माजी शिक्षकांना ह्या शताब्दी समारोह निमित्त आनंद यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन केले. श्री उल्हासजी बपोरीकर यांनी सर्व उपस्थित त्यांना आपण अत्यल्प दरात विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक सुविधा कशा प्राप्त करून देऊ शकतो, याबाबतीत विद्यमान कार्यकारणीची काय संकल्पना आहे ,याविषयी विस्तृत माहिती करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविताना संस्थेच्या अध्यक्षा सौ.मायाताई शिराळकर यांनी वर्षभर साजऱ्या होणाऱ्या ह्या आनंद सोहळ्यात सर्व शिक्षकांना सहभागी होण्यासाठी व समाजातील सर्व स्तरांमध्ये नवनवीन उपक्रमांची माहिती कशी पोहोचविता येईल या संदर्भात मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांनी संस्थेतील सर्व शिक्षकांचे मनोधैर्य वाढवून ,त्यांच्या कामाचे कौतुक केले. दादासाहेब खापर्डे, लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस व तत्कालीन अनेक स्वातंत्र्यसैनिकांची पाय धूळ या शाळेला लाभली आहे .अशा पवित्र वास्तुला आज शंभर वर्ष पूर्ण होत आहेत हा अत्यंत भाग्यकारक योग असल्याचे त्यांनी सांगितले. या ऐतिहासिक क्षणाचे आपण सर्व साक्षीदार आहोत त्याचा आपल्या सर्वांना विशेष अभिमान वाटला पाहिजे, या गोष्टीचा त्यांनी पुनरुच्चार केला .या कार्यक्रमासाठी नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे ज्येष्ठ उपाध्यक्ष ,डॉक्टर कसबेकर ,मंडळ प्रतिनिधी श्री नवसाळकर, श्री रविंद्र खांडेकर ,सचिव श्री सोमण सर, सहसचिव सौ ममता पांडे, डॉ. श्री अविनाश मोहरील, सौ. वल्लरी ठीपसे यांची उपस्थिती होती न्यू हायस्कूल मेन येथील माजी मुख्याध्यापक ,शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्साहाने उपस्थिती दर्शविली व कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ,शाळेतील शिक्षिका संजीवनी देशपांडे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# नवे वर्ष नवा संकल्प...




**डॉ. धनराज चक्रे**
अमरावती



आज नव्या वर्षाच्या उंबरठ्यावर आपण येऊन पोहचलेलो आहोत. नवा जोश, नवा उत्साह, नवे स्वप्न घेऊन मार्गक्रमण करत असताना आठवणींची शिदोरी सोबत घेऊन उत्साहाने आपण सर्वजण आनंदाने नव्या वर्षाचे स्वागत करूया.आपापसातील मतभेदांना तिलांजली देऊन पुन्हा नवे अतूट नाते निर्माण करूया. भले बुरे जे घडून गेले विसरून जाऊ सारे क्षणभर जरा विसावू या वळणावर या गीतातील शब्दाप्रमाणे नव्या सकारात्मक विचारांना घेऊन पुढे जाऊया.नक्कीच जगण्याची परिभाषा बदलत चालली असली तरी माणसातली माणुसकी काही अंशी टिकून आहे. याचे आत्ताचे ताजे उदाहरण म्हणजे जळगावमधील युवाशक्ती फौंडेशन नवीन वर्षानिमित्त कोणताही अनावश्यक खर्च न करता ही युवाशक्ती अनाथ आश्रमातील मुलांसोबत नवे वर्ष साजरे करणार आहे. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये नात्यांची वीण ढिली होत असताना इतरांबरोबर आनंद वाटून घेण्याच्या घटना दुर्मिळ होत आहेत. या युवाशक्तीच्या स्तुत्य उपक्रमाचं सर्वानीच कौतुक केले पाहिजे. नवीन वर्ष म्हणजे पुढच्या वर्षी कुठला नवीन संकल्प करावा प्रत्येक वर्षाच्या डिसेंबरच्या पहिल्या दिवसापासूनच नूतन वर्षाची चाहूल लागलेली असते. , असा विचार सुरू होतो.नववर्षाची सकाळ होताच तुमचं आयुष्यही व्हावं प्रकाशमय ही प्रार्थना करू, नववर्ष तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबाला खूप खूप चांगलं जावो. परंतु, काहींचे संकल्प मात्र काळ्या दगडावरील रेघेप्रमाणे असतात. हे लोक आपले संकल्प कृतीतही आणतात. त्यांचे हे संकल्प एक- दोन दिवसासाठी नव्हे तर वर्षानुवर्ष पाळले जातात. मग त्यांची प्रेरणा घेऊन आपणही यावर्षी काही संकल्प करूया आणि ते पाळूयाही.नव्या वर्षाच्या नव्या क्षणाला सूर्यकिरणांच्या साक्षीने आणि नव्या वर्षाचे स्वागत मधुर स्वरांनी करणाऱ्या पक्षांच्या साक्षीने प्रतिज्ञा करायची आहे नव्याने जगण्याची आणि नव्याने बहरण्याची.कोण म्हणते? मनावरल्या जखमा कधी पुसल्या जात नाहीत आणि काळजावरचे व्रण कधी मिटत नाहीत.

आम्ही सांगतो जखमाही मिटतात आणि व्रणही पुसले जातात फक्त मनाची तयारी आणि सकारात्मक विचारांची दिशा असेल तर सगळ्या अश्यक्य गोष्टी शक्य आहेत आणि आज या नव्या वर्ष्याच्या आगमनाला आपणाला हाच निश्चय आणि संकल्प करायचा आहे.आजकाल अपयशाची कारणे सांगणारे अनेकजण आहे. कुणी परिस्थितीच कारण सांगत तर कुणी शिक्षणच चांगलं नव्हतं असे सांगत असतात पण मोलकरणीची पोरगी अधिकारी झाली आणि रिक्षा ड्रायव्हरचा मुलगा सी.ए. झाला हे कारणे सांगणाऱ्यांना दिसत नाही. किंवा त्या गोष्टीचा ते विचार करत नाहीत पण त्यांच्या यशाचं कारण होते त्यांचा स्वतावर असलेला विश्वास आणि उराशी बाळगलेले स्वप्न.तोच विश्वास आणि हेच स्वप्न आज अपयशयाची कारणे सांगणाऱ्या तरुणाईने उराशी बाळगून नववर्षाच्या साक्षीने ते सत्यात उतरविण्यासाठी संकल्प करायचा आहे. नूतन वर्ष सुरू होण्यासाठी आता बोटावर मोजण्याइतकेच काही तास शिल्लक राहिले आहेत. स्वत:साठी व आपल्या प्रियजनांचे जीवन अधिक समृध्द व अर्थपूर्ण व्हावे यासाठी काही संकल्प केले पाहिजेत. छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरत असतात. त्यामुळे सुरू होणार्या नवीन वर्षाच्या सुरवात होण्यापूर्वीच आम्ही आपल्याला काही टिप्स देत आहोत.

धावत्या जगासोबत धावत असताना जीवनरूपी प्रवासात आपल्याला विविध प्रवृत्तीचे लोक भेटतात. आपण त्यांना गुणदोषांसहीत स्वीकारत असतो. त्यामुळे आपण काही अशा गोष्टींच्या इतके आहारी जातो, की त्याचा आपल्याला तर मन:स्ताप तर होतोच. परंतु, त्याच्या दुपटीने आपल्या कुटुंबाला होत असतो. आपण आपली नैतिक जबाबदारी लक्षात घेऊन अशा गोष्टींपासून पिच्छा सोडवून घेण्यासाठी निमित्ताची वाट बघत असतो. परंतु, त्या निमित्तासोबत आपल्या मनावरही आपला ताबा असला पाहिजे.

स्वत:साठी वेळ काढा– घरातील कामकाज व नोकरीतील टेन्शन यात 'सँडविच' होत असते. त्यामुळे व्यक्तीचा स्वत:कडे लक्ष द्यायला फारसा वेळ मिळत नाही. दिवसभरातून किमान १० ते १५ मिनिटे स्वत:साठी काढून ठेवली पाहिजे. या पंधरा मिनिटात आपण एखादा छंद जोपासू शकता. व्यायाम करून फिट राहू शकता.

सकारात्मक विचार करायला शिका–एखाद्या चांगल्या गोष्टीचा उलटा अर्थ काढणे, त्यामुळे विनाकारण अधिक विचार करणे व त्या गोष्टीचा उगाच बाऊ करणे, हा आपला स्वभाव बनून जातो. त्यामुळे आपल्या मनावर तसेच आरोग्यावर विपरित परिणाम होत असतो. त्यासाठी नवीन वर्षात सशक्त व सकारात्मक विचारसरणीचा संकल्प केला पाहिजे. आपला विचार सकारात्मक असला म्हणजे भविष्यात आपले कोणीच वाईट चिंतणार नाही, हे ठामपणे ठरविले पाहिजे. अशा गोष्टी आपला आत्मविश्वास वाढवत असतात. अगदी कठिण परिस्थितीत आपल्याला सामना करण्याची हिंमत देतात.

स्वत:ची कामे स्वत: करा– आपल्याला सगळ्यात जास्त त्रास स्वत:मुळेच होतो. कुठली ना कुठली वाईट सवय आपल्याला जडलेली असते. त्यात आपला आद्य शत्रू म्हणजे आळस. आपण किमान स्वत:ची तरी कामे स्वत: केली पाहिजेत. नियोजन आखून कामे उरकली पाहिजे. त्यामुळे आपल्याला कामाची शिस्त लागते. नवीन वर्ष म्हणजे नवीन वर्ष किंवा नवीन दिनदर्शिका सुरू होण्याची वेळ किंवा दिवस. या दिवसापासून वर्षाची मोजणी एका अंकाने वाढत. मनातील भावना शब्दात व्यक्त केल्या शिवाय, त्या आपल्या माणसापर्यंत पोहचत नाही. वेळ ही कोणासाठी थांबत नाही, आणि आयुष्य मार्गक्रमण करीत पुढे पुढे सरकत असते. आयुष्यात खुप माणसे भेटतात, वाऱ्याच्या झुळूके प्रमाणे येतात आणि जातात. पण काही माणसं अशी असतात, जी मनात जागा घेतात. हीच गोड माणसं जीवनाचा अर्थ सांगतात. ओठावर हसु खुलवतात आणि अश्रुही पुसतात. कधी हक्काने चेष्टा मस्करी करतात, तर कधी मध्येच भावनिक होतात.... माणसाच्या स्वभावात गोडवा, शालीनता, प्रामाणिकपणा, आणि विनयशीलता असेल, तर त्याची काही क्षण जरी सोबत मिळाली तरी ती हवीहवीशी वाटतेबदल हा निसर्गाचा नियम आहे जुन्या ऋतूत झाडाची जुनी पाने गळून त्याला नवी पालवी फुटते, काळाच्या महावृक्षावरून देखील जुने दिवस गळून पडतात आणि त्याला नव्या दिवसाची पालवी फुटते.इतर संस्कृती त्यांचा पारंपारिक किंवा धार्मिक नवीन वर्षाचा दिवस त्यांच्या स्वतःच्या रुढीनुसार पाळतात आणि कधीकधी नागरी दिनदर्शिकेतील . भारतात आणि इतर देशांत वेगवेगळ्या तारखांवर नवीन वर्ष साजरे केले जाते.

भारतातील अनेक राज्यांत पण नवीन वर्षाचे दिवस वेगवेगळे आहेत.तर दिवसांसारखाच असतो हाही दिवस तसाच उगवतो अनू तसाच मावळतो.....तरीही त्यावर असतो नव्या नवतीचा तजेला.... या दिवशी उगवणारा सूर्य घेऊन येतो आशेच्या नव्या किरणांचा नजराणा... त्यावर असते नवीन वर्षाची नव्हाळी अनू सोनेरी स्वप्नांची झळाळी...म्हणूनच इतर दिवसांसारखाच नसतो हा दिवस तो असतो नव्या वर्षाचा आरंभ नव्या स्वप्नांचा प्रारंभ!

**नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !**




## हँगओव्हर झालात !!! हँगओव्हर उतरवण्यासाठी वापरा 'हे' घरगुती उपाय

दि.१विदर्भ प्रजासत्ताक न्यू इयर सेलिब्रेशन करताना जोरदार पार्टी केली जाते. पार्टी सेलिब्रेशनमध्ये मद्याचे प्याले रिचवले जातात. अनेकजण प्रमाणापेक्षा मद्य घेतात अथवा मद्याचे कॉकटेल करून नवीन प्रयोग करत असतात. मात्र, नंतर दुसऱ्या दिवशी त्याचा त्रास जाणवतो. डोकेदुखी, मळमळणे आदी प्रकारचा त्रास होतो. याला हँगओव्हर असेही म्हटले जाते.



हँगओव्हर हा अतिशय त्रासदायक ठरतो. तुम्हाला हँगओव्हरपासून सुटका हवी असेल तर तुम्ही घरगुती उपायदेखील वापरू शकता. घरगुती उपायाद्वारे तुमचा हँगओव्हरचा त्रास कमी होईल.

**आलं–** हँगओव्हर कमी करण्यासाठी आलं हा रामबाण उपाय आहे. आलंमुळे अल्कोहोल पचन करण्यास मदत करते आणि पोटातील दाह शांत होतो. त्यामुळे हँगओव्हरचा त्रास बऱ्यापैकी कमी होण्यास मदत होते.

**केळी–** अतिमद्यपान केल्याने तुमच्या शरीरात पोटॅशियमची कमतरता होते. हे पूर्ण करण्यासाठी केळी खाणे हा एक सोपा उपाय आहे. केळीमध्ये पोटॅशियम मुबलक प्रमाणात असते. केळी पोटाला आराम आणि एनर्जी लेव्हल वाढवण्यासही मदत करते.

**पाणी–** हँगओव्हरपासून मुक्त होण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे अधिकाधिक पाणी पिणे. अल्कोहोलमुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण करते. वारंवार लघुशंकेला जाणे, उल्टी होणे आदींमुळे शरिरातील पाण्याची पातळी कमी होते. त्यामुळे डिहायड्रेशनचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे पुन्हा अधिकाधिक पाणी पिऊन आपले शरीर पुन्हा हायड्रेट करू शकता.

**मध–** हँगओव्हरची लक्षणे कमी करण्यासाठी मध हा एक चांगला उपाय आहे. मधामध्ये असलेल्या पोटॅशियममुळे अल्कोहोलचे परिणाम कमी करण्यास मदत होते. मधामध्ये फ्रुक्टोज (ऱ्र्रीलीश) देखील आढळतो, जो साखरेचा एक प्रकार आहे. यामुळे शरीरातील हँगओव्हरची लक्षणे कमी होतात.

**टोमॅटो ज्यूस–** हँगओव्हरपासून मुक्त होण्याचा आणखी एक सोपा मार्ग म्हणजे टोमॅटोचा रस. त्यात फ्रुक्टोज (ऱ्र्रीलीश) असते. यामुळे अल्कोहोलचे जलद चयापचय करण्यास मदत होते. तसेच, व्हिटॅमिन सीचे प्रमाण हँगओव्हरपासून मुक्त होण्यास मदत करते.

हँगओव्हर उतरवण्यासाठी तुम्ही लिंबू पाणी प्राशन करू शकता. लिंबू पाण्यामुळे तुम्हाला चांगला आराम वाटू शकतो. हँगओव्हर असतानादेखील नाश्ता, जेवण वेळेवर करा आणि भरपूर झोप घ्या. झोप पूर्ण झाल्याने आराम वाटू शकतो. रात्रीच्या सेलिब्रेशनमुळे हँगओव्हरचा खूपच त्रास होत असल्यास डॉक्टरांचा सल्ला आवश्यक घ्या.

# श्याम चौक, राजकमल चौकातील भटक्या लोकांचा बंदोबस्त करा

## शिवसेना शिंदे गटाची मागणी

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** अमरावती शहरातील रहिवाशी नागरिकांना राजकमल चौक येथील उड्डाणपूलाखाली, श्यामचौकतील एस.बी.आय बँके समोर वास्तव्यास असलेल्या भटक्या लोकांचा भयंकर त्रास दिवसेंदिवस वाढतच चालला असल्याचे सांगत या भटक्यां लोकांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी निवेदन शिवसेना महानगरतर्फे आयुक्तांकडे करण्यात आलेली आहे.

नेहरू मैदान, पंचवटी व ईतत्र वास्तव्यास असलेले हे भटके नागरिक फारच त्रासदायक ठरत आहे.श्याम चौक,राजकमल चौक, उड्डाणपूलाखालील परिसरात ते ठाण मांडून बसले आहेत. उघड्यावरच ते त्यांचा संसार करीत असल्याचे विदारक चित्र पाहावंयास मिळत आहे. उघड्यावरच मास शिजवणे व ते खाणे, तिथेच झोपणे व लहान मुलांकडून भीक मागवून रहदारीस अडथळा निर्माण करणे,एवढेच नाही तर न्यु हायस्कुल मेन,महिला महाविद्यालया च्या मुख्य प्रवेशद्वारा समोरच सकाळी शौचालय करणे हा त्यांचा नेहमीचाच धंदा होऊन बसलेला आहे. शिवाय आपापसातील भांडणे, जोरजोऱ्याने शिवीगाळ करणे, मिळेल तेथे लघुशंका व प्रातः विधी आटोपणे इत्यादी घाणेरडे प्रकार दररोज अमरावतीकर जनतेला बघावयास मिळत असून महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर हा प्रकार दिसत आहे. महापालिकचे सुस्त प्रशासन डोळ्याने हे सर्व बघत आहे, यासर्व गोष्टींचा सोक्ष मोक्ष लावण्याची गरज आता निर्माण झाली आहे, असे मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.शिवसेना महानगरप्रमुख संतोष बद्रे व शहरप्रमुख आशिष ठाकरे यांच्या नेतृत्वात संबंधित निवेदन नुकतेच देण्यात आले. प्रशासन जर हतबल असेल तर त्यांचा बंदोबस्त शिवसेना आपल्या पद्धतीने करेल, अशी सक्त ताकीद यावेळी देण्यात आली.



मनपा प्रशासनाने पोलीस प्रशासनास विश्वासात घेऊन त्यांचा बंदोबस्त करावा, अशी भावना अमरावतीकर जनतेच्या मनात आहे. शहर विदृपीकारणाच्या विळख्यातून वाचवावे, रात्रीच्या सुमारास भटके लोक उड्डाणपुलाखालीच झोपतात. एखाद्यावेळी अपघात घडल्यास त्यांच्या जीवितला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही या निवेदनात सांगण्यात आले. यावेळी महिला जिल्हा संघटिका अर्चना इंगोले, उपजिल्हा प्रमुख सुनील केने, शहरप्रमुख बडनेरा गुड्डू कत्तलवार, अल्पसंख्यांक सेना सचिव नासिरभाई, उपशहरप्रमुख पंकज मुडे, उपशहर प्रमुख रुद्रा तिवारी, उपशहर प्रमुख शैलेश सूर्यवंशी, राजेंद्र देवडा, उपशहर प्रमुख, प्रभागप्रमुख शुभम साबळे, अक्षय कुलकर्णी, सुरज बर्डे, रुद्रा हरणे ईत्यादी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र चे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे १३ जानेवारीला दर्यापूर मध्ये

## शिवसंकल्प अभियान मेळावा अंतर्गत फुंकणार लोकसभा रणशिंग





**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर –** शिवसेनेला नवेबळ देण्यासाठी महायुती सरकारने आतापर्यंत केलेल्या सर्व विकासकामांची, योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र चे मुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे हे १३ जानेवारीला दर्यापूर मध्ये शिवसंकल्प अभियान मेळावा घेऊन लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे. ना एकनाथ शिंदे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचा आगामी लोकसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने राज्यव्यापी दौरा ६ जानेवारी पासून सुरु करणार आहेत

त्या करिता अमरावती जिल्ह्यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अमरावती जिल्हा मधील दर्यापूर येथे मोठी विशाल सभा होणार असून आणि त्यानंतर श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा नियोजित जागेवर भूमिपूजन करण्यात येणार आहे.

त्या सभेचे पूर्वनियोजन करण्याकरिता कॅप्टन अभिजित अडसूळ याच्या आदेशानुसार जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट, उपजिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख,उपतालुका प्रमुख, शहर प्रमुख, उपशहर प्रमुख, जिल्हा परिषद सर्कल प्रमुख, पंचायत समिती सर्कल प्रमुख, सह पदाधिकारी व कार्यकर्ते यांची शनिवार दिनांक ३० डिसेंबर २०२३ दुपारी ठीक ४ वाजता पूर्व नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी आपल्या मनोगतात आपल्या जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी यांनी शिवसैनिकांना १३ तारखेच्या मेळाव्याला उपस्थित राहण्याच्या सूचना देऊन सर्व शिवप्रेमींनी या मेळाव्याला व भूमिपूजनाला उपस्थित रहावे असे आवाहन केले त्यामध्ये अमरावती जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वाखाली महिला आघाडीजिल्हा प्रमुख अरुणा इंगोले, युवासेना जिल्हाप्रमुख राम पाटील, उपजिल्हाप्रमुख सुनील केने, प्रितेश अवघड, नंदू जाभूळकर,पुरुषोत्तम बनसोड, तालुकाप्रमुख महेंद्र भांडे, निवृत्ती बारबद्दे, विवेक महल्ले, सुधीर खंडार, मीनाक्षी ताई कपले, छाया निचळ, दीपाली शहा, शहर प्रमुख मुन्ना इसोकार ,तुषार चवधरी, आशिष ठाकरे,युवासेना तालुका प्रमुख सोपान वडतकर, स्वप्नील लहाने ,अतुल सगणे, सरपंच नीरज नागे,अमोल शिरभाते,सरपंच विजय मोहड, राहुल भुबर, गणेश गावंडे संजय राणे ,सुभाष घुटे,अजमत शहा,मनोज जैन, विलास धांडे, अमित ठाकरे, आकाश मोगरे,आकाश ठोकळ, गजानन पाटील, किरण वानखडे, विलास साखरे, हेमंत उमाळे, प्रतीक लाजूरकर, दीपक काठोळे, संदीप राजगुरे, विजय सगणे, प्रवीण सगणे, बाळू दाभाडे, प्रशांत सगणे ,न्याणेश्वर पटके, गोपाल सावळे, सागर गेठे, गोकुळ चांदुरकर, राम गावंडे ,मनोज गव्हाणे, सचिन कोरडे, अनिकेत कोळकर, माधव रहाटे ,नंदू पतीगे, सतीश वानखडे, योगेश वानखडे मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# जिजाऊ बँकसाठी ६९ टक्के मतदान

## आज सकाळ पासून मतमोजणीला सुरुवात



**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** येथील जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीसाठी रविवारी १९ मतदान केंद्रांमध्ये ६६७६ पैकी ४५९९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ही टक्केवारी ६८.८९ आहे. या निवडणुकीत परिवर्तन व सहकार या दोन पॅनलमध्ये काट्याची लढत झाली आहे. यामध्ये सर्वसाधारण गटात क्रॉस व्होटिंग मोठ्या प्रमाणात झाल्याने कुणाला धक्का देणार, हे सोमवारी स्पष्ट होणार आहे.

यावेळी दोन पॅनलमध्ये एकेका मतासाठी संघर्ष झाला. कुठलाही अनुचित प्रकार न होता मतदान शांततेत पार पडले. अमरावती शहरात आठ तालुक्यांसह जिल्ह्याबाहेरील काही शहरांतील ५०६४ मतदार व १२ केंद्र होती. त्यात ३३४७ मतदारांनी हक्कबजावला. अचलपूर, मोर्शी, दर्यापूर, चांदूरबाजार येथे व अकोला, नागपूर, यवतमाळ येथेदेखील प्रत्येकी एका

मतदान केंद्रावर मतदान झाले. मतमोजणीची प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी शंकर कुंभार व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी स्वातीगुडधे यांच्या मार्गदर्शनात शांततेत पार पडली. सोमवारी रुख्मिणीनगरातील सुयोग मंगल कार्यालयात सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी सुरूवात झाली असून कोणते पॅनल बाजी मारते या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पालक मंत्र्यांच्या आश्वासनामुळे ३ जानेवारीला होणारे चक्काजाम आंदोलन स्थगित !

## फळ पीक विम्याच्या मदतीसाठी संत्रा उत्पादक शेतकरी आक्रमक !

### चंद्रकांत पाटलांच्या बैठकीकडे हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष !



**दि.१विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी –** रिलायन्स इन्शुरन्स कंपनीने अमरावती जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मंजूर झालेल्या फळ पीकविमा रकमेवर १२.५० टक्के व्याज देऊन शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करावी, गारपिट विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीवर गुन्हे दाखल करून ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्यात यावे, बांगलादेश संत्रा निर्यात अनुदान संत्रा उत्पादक देण्यात यावे यासह आदी मागण्यां संदर्भात शेतकरी कृती समितीतर्फे ३ जानेवारी आयोजित केलेले हिवरखेड येथील चक्काजाम आंदोलन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिलेल्या आश्वासनामुळे तूर्तास स्थगित करण्यात आले असल्याची माहिती शेतकरी कृती समितीतर्फे पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली.अमरावती जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी हेक्टरी १२ हजार रुपये भरून २०२२ – २३ मध्ये आंबिया बहार संत्रा फळ पिक विमा मोठ्या प्रमाणात काढलेला होता. हवामानातील बदलामुळे उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन हे मिळत नाही. फळपिक नुकसान भरपाई मिळण्यासाठी एक उपाय म्हणून पुनर्रचित हवामान आधारीत फळ पीक विमा योजनेमध्ये मोठ्या अपेक्षेने विमा काढून सुद्धा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पीक विमा मदत वेळेवर दिल्या जात नसल्यामुळे शेकडो शेतकऱ्यांनी मोर्शी उपविभागीय कार्यालयावर धडक देऊन शासनाला व विमा कंपनीला निवेदन देऊन फळ पीक विमा मदत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी केली असून ३ जानेवारी रोजी हिवरखेड येथे चक्काजाम आंदोलन करण्याचा करण्याचा इशारा शासन व रिलायन्स जनरल इन्शुरन्स विमा कंपनीला देण्यात आला होता .शेतकरी कृती समिती व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी चक्काजाम आंदोलनाच्या दिलेल्या इशाऱ्याची दखल घेऊन राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांनी अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटिल यांची भेट घेऊन संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक करून केलेल्या अन्याया विरोधात तोडगा काढण्यासाठी त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी अमरावती येथे ४ जानेवारी रोजी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार डॉ अनिल बोंडे, यांच्या उपस्थितीत रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी, संबंधित विभागाचे अधिकारी, संत्रा उत्पादक शेतकरी यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन केल्यामुळे शेतकरी कृती समिती तर्फे ३ जानेवारी रोजी हीवरखेड येथे होणारे चक्काजाम आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले असून या गंभीर विषयांवर तोडगा न निघाल्यास पुढे तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला असून आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी व शासन जबाबदार राहणार असल्याची माहिती शेतकरी कृती समितीतर्फे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके, राहुल चौधरी, दिनेश घोरमाडे, विनोद ठोके, किशोर जिचकार, पदमाकर नवघरे, शेखर विघे, अंकुश धावडे, शेखर गावंडे, यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिला.अमरावती जिल्ह्यामध्ये हवामान आणि भौगोलिक परस्थितीनुसार संत्रा फळांची लागवड हजारो हेक्टर क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात लागवड केल्यामुळे जेवढे अधिकचे उत्पन्न यामधून आहे. तेवढ्याच प्रमाणात तोटाही असल्यामुळे पिकांना हवामान धोक्यांपासुन विमा संरक्षण दिल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने मदत होईल या करीता जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी हेक्टरी १२ हजार रुपये भरून २०२२ – २३ मध्ये आंबिया बहार संत्रा फळ पिक विमा मोठ्या प्रमाणात काढलेला होता. मात्र रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीने अमरावती जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक करून फळ पीक विमा मदत देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकरी आक्रमक झाले असून विविध आंदोलनांच्या माध्यमातून टोकाची भूमिका घेतांना दिसत असून पालकमंत्री चंद्रकांत पाटील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी काय करणार याकडे हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे .

# ४४ प्रवासी मृत्यूच्या दारात पण रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी वाचविले प्राण



**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्यावतीने नववर्षाच्या पूर्वसंध्येला रविवारी अमरावती महानगरातील शहीद स्मारक आणि थोर महापुरुषांच्या पुतळ्यांचा स्वच्छता करून पूजन करण्यात आले. शिवसेना नेते तथा खासदार अरविंद सावंत यांच्या आदेशानुसार हा उपक्रम राबविण्यात आला.

शिवसेना महानगर प्रमुख पराग गुडधे यांच्या नेतृत्वात येथील ईर्विन चौक स्थित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयस्तंभ चौकातील राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळा, चित्रा चौकातील समाजसुधारक महात्मा फुले यांचा पुतळा तर बडनेरा नवीवस्ती स्थित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची स्वच्छता करण्यात आली. यावेळी अमरावती विधानसभा संघटक नितीन हटवार ,उपमहानगर प्रमुख संजय शेटे, विजय ठाकरे, सुनील राऊत, युवासेना जिल्हाप्रमुख प्रमोद धनोकार, तालुकाप्रमुख कपिल देशमुख ,विजय बेनोडकर, जयंत इंगोले, डॉ. जुबेर, याया खान पठाण, बंडू कथीलकर आदी शिवसैनिक उपस्थित होते.

अमरावती :

रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) कर्मचारी मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी नेहमीच आघाडीवर आहेत. २४ तास जागरूक हे त्यांच्या कर्तव्याची उद्दिष्टे आहेत. मात्र एप्रिल ते नोव्हेंबर २०२३ या दरम्यान रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून ४४ प्रवाशांचे प्राण वाचविले आहेत.मध्य रेल्वे रेल्वे सुरक्षा बलाच्या जवान 'मिशन जीवन रक्षक' या मोहिमेचा एक भाग म्हणून प्रवाशांच्या मदतीला धावून जातात. आरपीएफने ज्या प्रवाशांचे प्राण वाचविले, त्या घटनांचे दृष्य वृत्तपत्र वा इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये खूप लोकप्रिय झाले आणि विविध समाज माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. या ४४ घटनांपैकी एकट्या मुंबई विभागात जीव वाचविणाच्या एकूण २१ घटनांची नोंद झाली आहे. भुसावळ विभागात १५, पुणे विभागात ४, तर नागपूर विभागात २ आणि सोलापूर विभागात दोन जीव वाचविण्याच्या घटनांची नोंद झाली आहे.

> ट्रेन सुटण्याच्या वेळापत्रकाच्या अगोदर स्थानकावर पोहोचण्याचा प्रयत्न करावा. प्रवाशांनी धावत्या ट्रेनमधून चढू अथवा उतरू नये व जीव धोक्यात घालू नये. रेल्वे प्रवासाचे नियोजन करावे.
> **शिवाजी मानसपुरे,** जनसंपर्क अधिकारी, भुसावळ मध्य रेल्वे

रेल्वे सुरक्षा बलाच्या या जवानांना प्रवासी आणि रेल्वे मालमत्तेवरील गुन्हे, अतिरेकी हिंसाचार, ट्रेनच्या वाहतुकीत होणारा अडथळा, हरवलेल्या मुलांची सुटका तसेच रेल्वे मध्ये आणि रेल्वे परिसरात अमली पदार्थ जप्त करणे, प्रवाशांचे सामान परत मिळविणे आदी विविध सुरक्षा आव्हानांचा सामना करावा लागतो आणि त्याप्रमाणे ते आपले लक्ष प्रवाशांच्या सुरक्षेवर केंद्रित करून असतात.

रेल्वे सुरक्षा बलाच्या सतर्कतेने विविध प्रकरणांमध्ये प्रवाशांचे प्राण वाचविले आहेत. यात प्रवासी काहीवेळा निष्काळजीपणा करतात आणि धावत्या ट्रेनमध्ये चढताना किंवा उतरताना धोका पत्करतात. काहीवेळा विविध वैयक्तिक कारणांमुळे आत्महत्येचा प्रयत्न करतानादेखील रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी लोकांचे जीव वाचविले आहे. शेवटी एखाद्याचा जीव वाचविण्याच्या या कृतीचा रेल्वे सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्यांप्रती आनंद आणि कृतज्ञता वाढवतो.

# नववर्षाच्या प्रारंभी शिवसेनेतर्फे शहीद स्मारक, महापुरूषांच्या पुतळ्यांची स्वच्छता



**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्यावतीने नववर्षाच्या पूर्वसंध्येला रविवारी अमरावती महानगरातील शहीद स्मारक आणि थोर महापुरुषांच्या पुतळ्यांचा स्वच्छता करून पूजन करण्यात आले. शिवसेना नेते तथा खासदार अरविंद सावंत यांच्या आदेशानुसार हा उपक्रम राबविण्यात आला. शिवसेना महानगर प्रमुख पराग गुडधे यांच्या नेतृत्वात येथील ईर्विन चौक स्थित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयस्तंभ चौकातील राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळा, चित्रा चौकातील समाजसुधारक महात्मा फुले यांचा पुतळा तर बडनेरा नवीवस्ती स्थित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची स्वच्छता करण्यात आली. यावेळी अमरावती विधानसभा संघटक नितीन हटवार ,उपमहानगर प्रमुख संजय शेटे, विजय ठाकरे, सुनील राऊत, युवासेना जिल्हाप्रमुख प्रमोद धनोकार, तालुकाप्रमुख कपिल देशमुख ,विजय बेनोडकर, जयंत इंगोले, डॉ. जुबेर, याया खान पठाण, बंडू कथीलकर उपस्थित होते.

# विद्यापीठात १७४ पदे रिक्त अन् १२० कंत्राटी

## कुलगुरू, प्र-कुलगुरूदेखील प्रभारी




**दि.१विदर्भ प्रजासत्ताकअमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या एकूण ४७४ मंजूर पदांपैकी १७४ पदे रिक्त आहेत. १२० कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. कुलगुरू, प्र-कुलगुरु, वित्त व लेखा अधिकारी, परीक्षा विभागाचे संचालक अशा एक ना अनेक पदांचा 'प्रभारी' कारभार सुरू आहे. त्यामुळे विद्यापीठाचे अँकेडमिक पूर्णत: ढासळले आहे. डिसीजन मेकर अधिकारी नसल्याने फाईल तुंबल्याचे वास्तव आहे. जानेवारी २०२३ मध्ये कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांचे दुर्धर आजाराने निधन झाले. तेव्हापासून कायमस्वरूपी कुलगुरू नाहीत. प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी डिसेंबरअखेरपर्यंत कुलगुरू पदांचा प्रभार हाताळला; पण कामकाजाची गती येवले यांना आणता आली नाही.

अमरावती ते छत्रपती संभाजीनगर असा प्रवास डॉ. येवले करून त्रस्त झाले होते. आता गत दोन दिवसांपूर्वी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्राचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्याकडे नवीन कुलगुरूंची नियुक्ती होईस्तोवर पुन्हाकुलगुरूपदाचा प्रभार सोपविला आहे; मात्र 'डिसीजन मेकर' पदांवर अधिकारी नसल्यामुळे विद्यापीठाचा गाडा केव्हा सुरळीत होणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक https://epaper.vidarbhaprajasattak.com सोमवार दि. १ जानेवारी २०२४


# नव्या वर्षांत सरकारी महोत्सवांची रेलचेल

## प्रत्येक जिल्ह्यात सांस्कृतिक, युवा महोत्सव, महानाट्य

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती १४** सोमवारपासून सुरू होणारे २०२४ हे नवे वर्ष निवडणुकीचे असल्याने राज्य शासनाने पहिल्या सहा महिन्यांतच विविध विभागांच्या माध्यमांतून अनेक महोत्सवांचे आयोजन केले असून त्यासाठी घसघशीत आर्थिक तरतूदही केली आहे.



२०२३ पासूनच अनेक सरकारी कार्यक्रमांच्या माध्यमातून शासनाच्या कामाची प्रसिद्धी व प्रचार सुरू आहे. कधी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने विविध गावांमधील माती गोळा करणे असो किंवा विकास यात्रेच्या माध्यमातून केंद्राच्या योजनांची माहिती देणे असो. महाराष्ट्र सरकारही यात मागे नाही, 'सरकार आपल्या दारी'च्या माध्यमातून राज्यभर अनेक कार्यक्रम राज्याच्या विविध भागात झाले आहे. सोमवारपासून सुरू होणाऱ्या २०२४ ची सुरुवातही विविध महोत्सवांच्या माध्यमातून होत आहे. सांस्कृतिक विभागाच्यावतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त १५ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात सलग पाच दिवस महासंस्कृती महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. विविध राज्यातील संस्कृतीचे आदानप्रदान, लुप्त होत चाललेल्या संस्कृतीचे जतन व संवर्धन आणि स्वातंत्र्यलढ्याची माहिती लोकांपर्यंत पोहचवणे यासाठी हा कार्यक्रम असल्याचे या खात्याच्या २२ डिसेंबरला काढलेल्या शासन निर्णयात नमूद आहे.'

राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा खात्यातर्फे १५ जानेवारीपासून प्रत्येक जिल्ह्यात युवा महोत्सव होणार आहे. युवकांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून हा उपक्रम असल्याचा दावा शिक्षण विभागाने २२ डिसेंबरला काढलेल्या शासन निर्णयात केला आहे.

' पर्यटन व सांस्कृतिक खात्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त जून २०२३ पासून विविध कार्यक्रम राज्यभर घेतले जात आहेत. याच उपक्रमाचा पुढचा भाग म्हणून आता जानेवारी ते जून २०२४ पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात तीन दिवस छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित महानाट्य महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी ३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यातून महानाट्याची प्रसिद्धी आणि आयोजनाच्या खर्चासाठी प्रत्येक जिल्ह्यांना निधी देण्यात येणार आहे.

# थर्टी फर्स्टच्या बंदोबस्ताची पोलीस आयुक्तांनी केली पाहणी

## वाहन चालकांची ही झाली तपासणी





### रात्री १२ वाजता कापला केक

राजापेठ पोलिस स्टेशनला नव वर्षाच्या स्वागतानिमीत्त सीपी नविनचंद्र रेड्डी रात्री बारा वाजता पत्नी वाणी नविनचंद्र रेड्डी पोहचले. त्यांनी नववर्षाच्या स्वागतानिमित्त केक कापला. यावेळी पोलिस उपायुक्त सागर पाटील, सहायक पोलिस आयुक्त पुनम पाटील, एसीपी फ्रेजरपुरा कैलाश फुंडकर, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे, राजापेठच्या ठाणेदार सिमा दाताळकर, कोतवाली पीआय विजयकुमार वाकसे उपस्थित होते. उपस्थितांना गुलाब पुष्प देवून नववर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.





**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी थर्टी फर्स्टच्या रात्री १२ वाजता स्वतः ऑन रोड उतरुन बंदोबस्ताची पाहणी केली. त्यांनी राजकमल चौक येथे जाऊन पोलिस बंदोबस्ताचा आढावा घेतला. एवढेच नव्हे तर स्वतः वाहनचालकांची तपासणी केली. यावेळी त्यांच्यासोबत उपायुक्त सागर पाटील व अन्य पोलिस कर्मचारी उपस्थित होते. यावेळी



दुचाकी चालकांची बारकाईने तपासणी करण्यात आली. पोलिसआयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी स्वतः बंदोबस्ताविषयी निर्देश दिले. सुरक्षेच्या दृष्टीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुचना दिल्या. यावेळी पोलिस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पेट्रोलिंगमध्ये सहभाग घेतला. शहरातील प्रमुख चौकावरचौकावर पोलिसांचा कडक बंदोबस्त होता. तसेच उड्डाणपुलावर बॅरिकेटस लावून वाहतूक बंद करण्यात आली होती. रात्री उशिरापर्यंत शहरात न ठिकठिकाणी पोलिस दिसून येत होते. गाडगेनगर, राजापेठ, पंचवटी, उड्डाणपुलच्या दोन्ही बाजुनी बॅरीकेटस लावले होते. इर्विन चौक, राजापेठ, जयस्तंभ, गाडगेनगर, राजकमल या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त होता. येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. ड्रंकन ड्राईव्ह अंतर्गत तपासणी करण्यात आली.

# नववर्षाच्या पहिल्याच दिवशी ISRO च्या XSPECT ची अवकाशात भरारी

## मोहीमेद्वारे कृष्णविवरांचं रहस्य उकलण्याचा प्रयत्न

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक श्रीहरीकोटा** – पहिला दिवस. देशभरात न्यू ईयरचं जल्लोषात साजरा करण्यात आलं. अशातच भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं नववर्षाच्या पहिल्याच दिवशी मोठा इतिहास रचला आहे. इस्रोनं १ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजून १० मिनिटांनी 'क्ष-किरण पोलारिमीटर उपग्रह' (एक्सपोसॅट) मिशनचं प्रक्षेपण केलं. २०२३ मध्ये चांद्रयान-३ मिशनद्वारे चंद्रावर पोहोचल्यानंतर आणि आदित्य एल-१ मिशनद्वारे सूर्याकडे प्रवास सुरू केल्यानंतर, इस्रोनं यावर्षी अंतराळ क्षेत्रात पहिले पाऊल टाकलं आहे.

इस्रोनं सांगितलं की, नव्या वर्षातील पहिली मोहीम आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित करण्यात आली. मिशन च्या प्रक्षेपणामुळे, कृष्णविवर आणि न्यूट्रॉन ताऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी अवकाशात विशेष खगोलशास्त्र वेधशाळा पाठवणारा भारत हा जगातील दुसरा देश बनला आहे. एक्सपोसॅट ही संशोधनासाठी एक प्रकारची वेधशाळा आहे, जी अवकाशातील कृष्णविवर आणि न्यूट्रॉन ताऱ्यांबद्दल अधिक माहिती गोळा करेल. एक्सपोसॅट उपग्रह वर्षाच्या पहिल्या दिवशी श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपित केला जाईल. हा उपग्रह अवकाशात होणाऱ्या




किरणोत्सर्गाचा अभ्यास करेल. त्यांच्या स्रोतांचे फोटो घेतील. त्यात बसवलेली दुर्बीण रमण संशोधन संस्थेनं बनवली आहे. हा उपग्रह विश्वातील ५० तेजस्वी स्रोतांचा अभ्यास करणार आहे. जसं- पल्सर, ब्लॅक होल एक्स-रे बायनरी, सक्रिय गॅलेक्टिक न्यूक्ली, नॉन-थर्मल सुपरनोव्हा. हा उपग्रह ६५० किमी उंचीवर पाठवण्यात येणार आहे.

२०१७ मध्ये इस्रोनं हे अभियान सुरू केलं होतं. या मोहिमेचा खर्च ९.५० कोटी रुपये आहे. प्रक्षेपणानंतर सुमारे २२ मिनिटं, एक्सपोसॅट उपग्रह त्याच्या नियुक्त कक्षेत तैनात केला जाईल. या उपग्रहामध्ये दोन पेलोड्स आहेत.

### Polix म्हणजे काय?

पोलिक्स हा या उपग्रहाचा मुख्य पेलोड आहे. हे रमण संशोधन संस्था आणि यूआर राव सॅटेलाइट सेंटर यांनी संयुक्तपणे तयार केले आहे. १२६ किलो वजनाचे हे उपकरण अवकाशातील स्रोतांचे चुंबकीय क्षेत्र, रेडिएशन, इलेक्ट्रॉन इत्यादींचा अभ्यास करेल. हे ८-३० ज्ञशत श्रेणीच्या ऊर्जा बँडचा अभ्यास करेल. पोलिक्स अवकाशातील ५० पैकी ४० तेजस्वी वस्तूंचा अभ्यास करेल.

### XSPECT म्हणजे काय?

दडझएउढ म्हणजे, एक्स-रे स्पेक्ट्रोस्कोपी आणि वेळ. ते ०.८-१५ ज्ञशत श्रेणीच्या ऊर्जा बँडचा अभ्यास करेल. म्हणजेच, ते पोलिक्सच्या श्रेणीपेक्षा कमी ऊर्जा बँडचा अभ्यास करेल. हे पल्सर, ब्लॅक होल बायनरी, कमी-चुंबकीय क्षेत्राचे न्यूट्रॉन तारे, मॅग्नेटार इत्यादींचा अभ्यास करेल

# 'समृद्धी'वरील भीषण दुर्घटना; ट्रॅव्हल्स चालकासह मालकाविरुद्ध न्यायालयात

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा :** समृद्धी महामार्गावरील आजवरचा सर्वात भीषण व तब्बल २५ प्रवाशांचे बळी घेणाऱ्या भीषण अपघातप्रकरणी चालक व खासगी बसच्या मालकाविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. यामुळे मृतांच्या वारसदारांना नवीन वर्षातच न्याय मिळण्याची शक्यता आहे.नोव्हेंबर २०२३ अखेर बुलढाण्यात ५७० लहान-मोठे अपघात झाले. त्यात ३५८ जणांनी जीव गमावला तर १३० जखमी झालेत. मात्र, समृद्धी महामार्गावर काही मिनिटातच २५ प्रवाशांचे बळी घेणारा अपघात जिल्ह्यासह राज्याचा थरकाप उडविणारा ठरला. ३० जूनच्या मध्यरात्रीनंतर झालेल्या 'त्या' अपघातात पेटलेल्या खासगी बसमधील २५ जणांचा काही क्षणातच जळून कोळसा झाला होता. 'डीएनए' चाचणीनंतर ओळख पटल्यावर २४ देहांवर बुलढाणा-चिखली मार्गावरील हिंदू स्मशानभूमीत सामूहिक अंत्यसंस्कार करण्यात आले. अपघातस्थळाइतकेच भीषण दृश्य जिल्हा रुग्णालयमधील शेकडो नातलगांचा आक्रोश व सामूहिक अंत्यसंस्काराचे होते. सरत्या वर्षात याचे स्मरण होतानाही जिल्हावासी आणि मृतांच्या वारसांचा थरकाप उडतो, एवढा तो भीषण अपघात



ठरला. चालक, वाहक आणि ६ प्रवाशी जखमी होऊन बचावणे हाच चमत्कार.या अपघाताचा तपास करणे आव्हानात्मक व गुंतागुंतीचे ठरले. मेहकरचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांनी नियमित व तांत्रिक तपास पूर्ण केला. नियमित कायदा सुव्यवस्थाचे काम सांभाळून अल्पावधीतच त्यांनी तपास पूर्ण केला. आरोपी बस चालक शेख दानिश शेख इस्त्राईल (रा. दारव्हा, जि. यवतमाळ) हा अपघातानंतर तुरुंगातच (एमसीआरवर) असल्याने त्यांच्याविरुद्ध तीन महिन्यातच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणे बंधनकारक होते. त्यामुळे वेळेशी शर्यत करून त्यांनी तपास करून परिवहन विभाग, प्रयोगशाळेचे अहवाल संकलन केले. यानंतर चालकाविरुद्ध सिंदखेडराजा न्यायालयात प्रकरण दाखल केले. बसच्या फरार मालक प्रगती दरणे याना अटक करण्यात आली, त्यांच्याविरुद्ध २९ नोव्हेंबरला दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. हे प्रकरण आता मेहकर जिल्हा व सत्र न्यायालयात वर्ग होणार आहे. नवीन वर्षातच सुनावणी होऊन वारसांना न्याय मिळण्याची शक्यता आहे.

### भातकुली तालुका वासियांना आ.रवी राणा यांची नविन वर्षाची एतिहासिक भेट

# भातकुली प्रशासकिय इमारत बांधकामासाठी ३६ कोटी मंजूर

**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** नागपूर अधिवेशन दरम्यान पुरवणी मागणी पत्रात भातकुली तालुका प्रशासकिय इमारत भवन बांधकाम करण्यासाठी एकून ३६ कोटी रुपये मंजूर करण्यात आला. एकाच छताखाली १३ कार्यालय राहणार आहे नागरिकांना शासकिय कामे करण्यासाठी ईतरत्र फिरण्याची, व खरचं करण्याची गरज राहणार नाही.अशी सोय वरील मॉडेल काम मंजुर केले आहे.आमदार



रवी राणा यांनी सातत्याने

### एकाच छताखाली १३ कार्यालय

जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांच्याकडे सातत्याने बैठका घेऊन तसा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री महसूल मंत्री ,पालकमंत्री , वित्त मंत्री, बांधकाम मंत्री यांच्याकडे पाठवून व मंत्रालयाकडे पाठ सतत पाठपुरावा करून नागपूर अधिवेशनादरम्यान पुरवणी मागणी पत्रात वरील काम मंजुर करुन घेतले.३६ कोटी रूपये खर्चातून तहसील कार्यालय भातकुली, पंचायत समिती कार्यालय भातकुली, उप विभागीय अधिकारी बांधकाम विभाग,भातकुली जि प बांधकाम विभाग, सहकारी अधिकारी श्रेणी-१ सहकारी संस्था भातकुली, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र भातकुली ,दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालय,उपकार्यकारी अभियंता उपविभाग भातकुली महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, तालुका आरोग्य अधिकारी उपअधीक्षक भूमी अभिलेख भातकुली,कृषी अधिकारी भातकुली, कार्यालयाचा समावेश आहे.

# शेताच्या कुंपणातीत विजेच्या धक्क्याने दोन महिलांचा मृत्यू

### दहसुर शिवारातील घटना

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी** तालुक्यातील दहसूरशिवारातील एका शेताच्या कुंपणातील वीज प्रवाहाच्या संपर्कात आल्याने कापूस वेचणीसाठी आलेल्या दोन महिला मजुरांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना वर्षाच्या सरते शेवटी रविवार, ३१ डिसेंबर रोजी सकाळी घडली. रुख्माबाई विठ्ठलराव नावंगे (६५) व मीरूबाई फगणू परतेती (६२) दोघीही रा. दहसूर अशी मृतकांची नावे आहेत. दहसूर येथील राजू मधुकर काकडे (३५) याने कपाशी व तुरीच्या पिकाचे वन्यप्राण्यांपासून संरक्षण करण्यासाठी शेताच्या कुंपणात विद्युत प्रवाह सोडला होता. दरम्यान, रविवारी त्याने कापूस वेचण्यासाठी महिला मजुरांना आपल्या शेतात पाठविले. तर तो स्वतः फवारणीसाठी घाटलाडकी येथे कीटकनाशक औषध आणण्यासाठी निघून गेला. दरम्यान, कापूस वेचणी करीत असताना कुंपणाच्या संपर्कात आल्याने रुख्माबाई यांना विजेचा धक्का बसला, त्यामुळे त्या जागीच





कोसळल्या, हे पाहून सोबत असलेल्या मीरुबाई यांनी तेथून घाव घेतली. परंतु, दुसऱ्या ठिकाणी त्यांनासुद्धा विजेचा धक्का बसला. त्यामुळे त्यासुद्धा 'खाली कोसळल्या, दरम्यान, राजू काकडे याची पत्नी पिण्याचे पाणी घेऊन शेतात गेल्यावर त्यांना रुख्माबाई व मिरुवाईह्या शेतात पडून असल्याने दिसून आले. त्यामुळे त्यांनी गावात जाऊन नागरिकांनी याबाबत माहिती दिली. त्यामुळे गावातील नागरिकांनी तातडीने शेत गाठून पाहणी केली. त्यावेळी त्यांना रुख्माबाई व मीरुबाई ह्या दोघी मृतावस्थेत दिसून आल्यात. त्यानंतर घटनेची माहिती मोर्शी पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेहांना शवविच्छेदना साठी रुग्णालयात पाठविण्यात आले, या प्रकरणी पोलिसांनी शेतात वीज प्रवाह सोडणाऱ्या आरोपी राजू काकडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला पुढील तपास सुरू आहे.




# अमरावतीकरांना रामजन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या अक्षता कलश यात्रेद्वारे मंदिर लोकार्पण कार्यक्रमाचे निमंत्रण



**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथे साकार झालेल्या भव्य श्रीराम मंदिराचे लोकार्पण २२ जानेवारीला होणार आहे. समस्त नागरिकांना या भव्य-दिव्य रामजन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पूजीत अक्षता रामदूतांमार्फत वितरित केल्या जात आहेत. याच शृंखलेत रविवारी (ता.३१) शहरात श्रीराम मंदीर अक्षता भव्य कलश यात्रा काढण्यात आली. शेकडो महिला-पुरुष रामदूत या अक्षता कलश यात्रेत सहभागी झाले होते. रविवारी सायंकाळी शहरातील सतिधाम मंदिर येथून या अक्षता कलश यात्रेची सुरुवातझाली. सतीधाम मंदिर येथून जयस्तंभ चौक मार्गे जवाहर रोड, संतोषी माता मंदीर, म.न.पा.कॉम्प्लेक्स, प्रभात चौक, बापट चौक, शाम चौक, राजकमल चौक, गांधी चौक मार्गे निघालेल्या या यात्रेचा समारोप एकविरा देवी मंदीर प्रागंणात करण्यात आला. कित्येक रामभक्तांचे बलिदान, शेकडो वर्षांची प्रतीक्षा, अश्या अथक प्रयत्नांती अखेर रामजन्मभूमीत भव्य राममंदिर साकार झाले. २२ जानेवारीला या मंदिराचे लोकार्पण होईल. त्या दिवशी सगळ्यांनी आपापल्या घरी-प्रतिष्ठानात, सर्व देवालयांत दिवे लावून दिवाळी साजरी करावी, हा संदेश या अक्षता कलश यात्रेच्या माध्यमातून देण्यात आला.वकील लाईन येथे असलेल्या श्री गजानन महाराज येथील मंदिरातून सुद्धा रामजन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या अक्षता वाटपाला सुरुवात झाली असून संपूर्ण परिसरात अक्षता वाटण्यात आल्यात या वेळी संपूर्ण वातावरण राममय झाले होते.

# मुख्य सचिव पदाचा कार्यभार डॉ. नितीन करीर यांनी स्वीकारला

**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**



महाराष्ट्राचे मुख्य सचिवपदी डॉ. नितीन करीर यांची आज नियुक्ती करण्यात आली. डॉ. करीर यांनी आज संध्याकाळी मुख्य सचिवपदाचा कार्यभार मनोज सौनिक यांच्या कडून स्वीकारला.

डॉ. करीर सध्या वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत आहेत. तत्पूर्वी त्यांनी महसूल आणि वने तसेच नगर विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून काम पाहिले आहे. डॉ. करीर यांनी एमबीबीएस पदवी घेतली. त्यांची १९८८ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झाली. त्यानंतर त्यांनी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी सांगली, पुणे जिल्हाधिकारी म्हणून काम केले.माहिती व जनसंपर्क महासंचालक, नोंदणी महानिरीक्षक, पुणे महापालिकेचे आयुक्त, पुणे विभागीय आयुक्त अशा विविध पदांची जबाबदारी सांभाळली आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, विक्रीकर आयुक्त, जमाबंदी आयुक्त या पदावरही काम केले आहे.

मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव विकास खारगे, सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, सामान्य प्रशासन विभागाचे (सेवा) अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार यादव, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव आशिष शर्मा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी यांनी मुख्य सचिव डॉ. करीर यांचे अभिनंदन केले.

# मोबाइलने आणली कार्ड विक्रेत्यांवर संक्रांत

## नववर्षाच्या स्वागताचे शुभेच्छापत्र झाले हद्दपार




**दि१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नववर्षाच्या स्वागतासाठी प्रत्येकजण तयार आहे. याचवेळी नववर्षाच्या स्वागताला प्रियजनांना दिले जाणारे शुभेच्छापत्र मात्र काळाच्या ओघात बाद झाले आहे. याची जागा आता मोबाइलवरील मेसेजने घेतली आहे. यामुळे शुभेच्छापत्र विक्रेत्यांवर संक्रांत ओढवली आहे. सिजनेबल दुकान लावणाऱ्या विक्रेत्यांना याचा मोठा फटका बसला आहे.पूर्वी नववर्षाच्या स्वागतासाठी प्रत्येक पुस्तकालयात शुभेच्छापत्रांची रेलचेल राहत होती. आठ दिवस आधीपासूनच असे शुभेच्छापत्र प्रियजनांना पाठविण्यासाठी विशेष तयारी केली जात होती. डाक विभागाकडून यासाठी काही सूटही मिळत होती. कुरिअरमधूनही असे शुभेच्छापत्र पाठविले जात होते. या दिवसाचे महत्त्व जाणून सिजनेबल दुकानदारांचे काही दुकाने या काळात पाहायला मिळत होते.काळानुसार साधे शुभेच्छापत्र रंगीत झाले. नंतर मल्टिकलर झाले. आता तर हे कार्डच मोबाइलवर आले. त्यात अँड्रॉइड मोबाइलने शुभेच्छापत्रांची रंगतच काढून घेतली आहे. पाहिजे तसे आणि पाहिजे तेव्हा शुभेच्छापत्र मिळविण्यासाठी गुगलकडून मदत होते. तर काही नवे ॲपही आली आहेत. यामुळे अशा पद्धतीचे शुभेच्छापत्र मिळविण्यावर ग्राहकांचा भर राहिला आहे.यामुळे शुभेच्छापत्रांचे कार्ड घेण्याकडे सर्वांनी पाठ फिरविली आहे. अशा प्रकारचे शुभेच्छापत्र निर्माण करण्याचे काम शुभेच्छापत्र कंपनीने थांबविले आहे. याचा परिणाम बाजारात पाहायला मिळत आहे.

# व्यवसायासाठी तीन लाखांपर्यंत कर्ज कारागिरांनो, तुम्ही नोंदणी केली का?

## पीएम विश्वकर्मा योजना : पाच टक्के व्याजाने तीन टप्प्यांत मिळतो लाभ

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**




पारंपरिक कौशल्य असलेल्या कारागिरांना व्यवसायासाठी पीएम विश्वकर्मा योजनेंतर्गत तीन लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. यात सरपंचांचीसुद्धा भूमिका महत्त्वाची असते.अमरावती जिल्ह्यातील कारागिरांना लाभ मिळावा यासाठी नोंदणी सुरू आहे.

भांडवलाअभावी कारागीर त्यांचा व्यवसाय वाढवू शकत नाहीत. अशा कारागिरांना मदत व आधुनिक प्रशिक्षण त्यांना देण्यासाठी पीएम विश्वकर्मा योजना राबविण्यात येत आहे. प्रशिक्षण घेतलेल्या कारागिरांना प्रारंभी एक लाख रुपये, नंतर दोन लाख व तिसऱ्या टप्प्यात तीन लाख रुपयांचे कर्ज पाच टक्के व्याजदाराने दिले जाणार आहे.योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित कारागिरांचे आधार कार्ड, पॅनकार्ड, जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, बँकेचे पासबुक, आदी कागदपत्रांची आवश्यकता आहे. सदर कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अर्ज मंजुरीसाठी संबंधित यंत्रणेकडे जाते.पीएम विश्वकर्मा योजनेबाबत शहरी व ग्रामीण भागात जनजागृती केली जात असली तरी आदिवासी व दुर्गम भागात या योजनेविषयी फारशी माहिती नाही. या योजनेबाबत नागरिकांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे.तेव्हाच या योजनेच्या लाभासाठी अधिकाधिक कारागीर अर्ज सादर करतील. याशिवाय दुर्गम भागात इंटरनेट सेवा नाही, तसेच ऑनलाइन केंद्राचा अभाव असल्याने कारागिरांना अर्ज सादर करण्यासाठी अडचणी येत आहेत.

### काय आहे पीएम विश्वकर्मा योजना?

सुतार, लोहार, कुंभार, मूर्तिकार, चर्मकार, न्हावी, धोबी, बुरड उद्योग, राजमिस्त्री, आदी विविध १८ पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांना प्रशिक्षण देऊन कर्जही उपलब्ध करून दिले जाते.

# अमरावतीत नववर्षाचे जल्लोषात स्वागत

## घरी, सोसायट्यांच्या गच्चीवर सेलिब्रेशन; हॉटेल, रेस्टॉरंट फुल्ल

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती १**



सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी महिन्याभरापासून तरुणाई सेलिब्रेशनचे प्लॅनिंग करत होती. २०२३ ला बाय बाय करत आणि हॅप्पी न्यू इयर म्हणत तरुणाईने नववर्षाचे स्वागत केले. नववर्षाच्या स्वागताचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. लेट्स डू पार्टी टू नाईट असे म्हणत डान्स फ्लोअरवर तरुणाई थिरकताना दिसली.

डिसेंबर महिना आला की थर्टी फर्स्टच्या सेलेब्रेशनचे बेत रंगू लागतात. थर्टी फर्स्ट कुठे साजरा करायचा? फार्म हाऊस, मित्रांच्या घरी, पब, हॉटेलमध्ये की घरीच... अशा चर्चांना उधाण येऊ लागते. या दिवसांत पोलिस बंदोबस्तही कडक असतो. त्यामुळे अनेकांनी बाहेर जाण्याचे टाळत, हॉटेलचे रेट पाहता घरीच नातेवाईक, कुटुंब, मित्र-मैत्रिणींसोबत एखाद्या गच्चीवर गप्पांचा फड रंगवत सेलेब्रेशन केले. काहींनी शनिवार, रविवारी फार्म हाऊस बुक केले होते; तर काहीजण चिखलदरा,पचमढी गेले आहेत.

थर्टी फर्स्ट सेलेब्रेशनसाठी शहरातील हॉटेल, मॉल सजविण्यात आले होते. अनेक ठिकाणी डान्स फ्लोअरची व्यवस्था करण्यात आली होती. या वेळी प्रवेश फीदेखील घेण्यात आली होती. ही फी अव्वाच्या सव्वा होती. ज्यांना परवडत होते, त्यांनी अशा इव्हेंटस्मध्ये सहभाग घेऊन थर्टी फर्स्ट सेलेब्रेशन करून नववर्षाचे स्वागत केले.

# चिखलदरा येथे भजन स्पर्धा उत्साहात संपन्न : ॲड यशोमतीताई ठाकुर यांचे आयोजन

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



रामचंद्र युवक कल्याण संस्था मोझरी अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी द्वारा स्व.भैय्यासाहेब ठाकुर यांच्या जयंती निमित्त अमरावती लोकसभा मतदार क्षेत्रातील जनतेकरीता भव्य महिला पुरूष व बालगट भजन स्पर्धा चिखलदरा येथील भवानी शिव मंदिर येथे संपन्न झाली महाराष्ट्रातील संताचा खरा विचार जनमानसात पोहचावा ग्रामीण भागातील कलावंतांची दखल व्हावी या उद्देशाने चिखलदरा सारख्या आदिवासी भागात या भजन स्पर्धेचे आयोजन आमदार यशोमतीताई ठाकुर यांच्या वतीने करण्यात आले कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून दर्यापुर मतदार संघाचे आमदार मा.बळवंराव वानखडे उद्धघाटक गोंडूजी पाटील ग्रामगीता प्रचारक मा. सुधीर धावडे नायब तहसीलदार माजी जिल्हा परिषद सदस्य वनमालाताई खडके माजी नगराध्यक्ष चिखलदरा भास्कर हरमकर जयंतराव खडके अमरावती जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष पंकज मोरे चिखलदरा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सहदेव बेलकर शहर अध्यक्ष जहीर भाई युवक काँग्रेस प्रदेश सचिव राहुल येवले युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष पीयुष मालवीय श्री गुरुदेव सेवा मंडळ तालुका सेवाधिकारी विठ्ठलराव रनबावळे कार्यक्रमात सिंधुताई सपकाळ यांचे चिरंजिव मा. अरुण सपकाळ पत्रकार विनसेट चंदामी पत्रकार नारायण येवले व सामजिक कार्यकर्ते ज्येष्ठ नागरिक यांचा यथोचित सत्कार करण्यात आला स्पर्धेत चिखलदरा तालुक्यातील अनेक महिला पुरुष बाल मंडळांनी सहभाग घेतला येथील ४ मंडळाची अंतिम फेरी साठी निवड करण्यात आली स्पर्धेचे परीक्षण महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक मा गोपाल सालोडकर मा.पराग पदवाड यांनी केले कार्यक्रमाचे सूत्र संचालन नगरसेवक अमर वानखडे आभार श्रीकृष्ण सगने सर यांनी मानले स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सेवादल तालुका अध्यक्ष संतोष गायन गणेश रनबावळे प्रल्हाद पाटील दिलीप चावंडे तुषार गायन संजय चौधरी गौरव ढोरे यांनी किशोर झाळखंडे विक्की राठोड यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालय येथे न्यूरोसर्जीकल मायक्रोस्कोपची महत्वपूर्ण सुविधा उपलब्ध

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये मागील सहा वर्षांपासून सर्वच प्रकारच्या आजारांच्या दृष्टीने अत्याधुनीक सोयीसुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. त्याच अनुषंगाने डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयामध्ये पहिल्यांदाच न्यूरोसर्जरी मायक्रोस्कोप व्दारा छोटे मेंदूची गाठीवर सर्जरी करण्यात आली. ही गाठ छोटया मेंदूची असून पुष्कळ गंभीर स्थितीत असते. ओएच३ लायका मायक्रोस्कोप उपलब्धतेमुळे अत्यंत किचकट असणारी सर्जरी आधुनिक रित्या पार पाडून यशस्वी झाली. डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालय येथे न्यूरॉलॉजी विभाग उत्तम रितीने कार्यरत असून त्यामध्ये न्यूरोसर्जन डॉ.बी.डी. ठोंबरे, डॉ. अमोल ढगे, डॉ.ए.एस.बेले, डॉ. एस.एस. गांधी व डॉ. एस. एस. कोठाळकर यांचा समावेश आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालय व अनुसंधान केंद्र अमरावती जिल्हयात सर्वात मोठे रुग्णालय असून येथे सर्वच प्रकारच्या सुपरस्पेशालीटी व विविध आजारां संबधीत अत्याधुनीक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. मेंदुच्या शस्त्रक्रियेसाठी वापरल्या जाणा-या तंत्रज्ञानात गेल्या काही वर्षांमध्ये झपाटयाने सुधारणा व बदल होत असल्याने न्यूरोसर्जरी विभागात न्यूरोसर्जीकल मायक्रोस्कोपची महत्वपुर्ण सुविधा उपलब्ध झालेली आहे. न्यूरोसर्जनला या महत्वपुर्ण सुविधेमुळे मेंदुची शस्त्रक्रिया अचूकपणे पार पाडता येणार आहे.

पश्चिम विदर्भात फारच कमी ठिकाणी न्यूरोसर्जिकल मायक्रोस्कोपची सुविधा उपलब्ध आहे. अमरावती येथे प्रथमच न्यूरोसर्जीकल मायक्रोस्कोपची सुविधा उपलब्ध झाल्याने ही बाब शहरवासीयांसाठी भुषणावह व आनंददायी ठरणारी आहे.

# वक्ता प्रशिक्षण कार्यशाळेसाठी शुभम बायस्कार यांची निवड

## पुण्यात 'हर घर सावरकर' समितीचे आयोजन- मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

'हर घर सावरकर' समिती पुणे यांच्या वतीने पुण्यात आगामी सहा ते सात जानेवारी दरम्यान होणार्या वक्ता प्रशिक्षण कार्यशाळेकरिता प्रखर वक्ता, लेखक, युवा पत्रकार शुभम बायस्कार यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रमधून काही मोजक्या वक्त्यांची परीक्षा व प्रात्यक्षिकाद्वारे निवड करण्यात आली. त्यामध्ये अमरावतीतून शुभम बायस्कार यांचा समावेश आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा विचार समाजातल्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'हरघर सावरकर' समितीमार्फत विशेष अभियान राबविले जात आहे. या अभियानाला महाराष्ट्र शासनाचे विशेष सहकार्य मिळत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली 'हरघर सावरकर' समिती कार्यरत आहे. त्या अंतर्गत आगामी सहा ते सात जानेवारीला



पुण्यात वक्ता प्रशिक्षण कार्यशाळा होत आहे. या विशेष कार्यशाळेकरिता महाराष्ट्रातून काही मोजक्या वक्त्यांची निवड करण्यात आली आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित परीक्षा, त्यांच्या कार्याची माहिती असलेल्या विविध पुस्तकांचे वाचन अशा पद्धतीने पहिल्या टप्प्यात आयोजकांच्या वतीने परीक्षा घेण्यात आली होती. त्यात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष ज्ञानाची चाचपणी करण्यासाठी आयोजकांच्या वतीने सावरकर यांच्या जीवनावर आधारित तीन मिनिटांची भाषणाची क्लिप मागविण्यात आली होती. या दोन्ही स्तरांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या वक्तांची निवड राज्यस्तरीय प्रशिक्षणाकरिता करण्यात आली आहे. यामध्ये अमरावतीतून युवा पत्रकार शुभम बायस्कार यांची निवड झाली आहे. सहा ते सात जानेवारी दरम्यान पुण्यात होत असलेल्या या कार्यशाळेला महाराष्ट्रातील अनेक दिग्गज साहित्यिक, विचारवंत, लेखक उपस्थित राहणार आहेत. बायस्कार यांच्या निवडीबद्दल राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्यासह विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# रविकांत तुपकरांनी लोकसभेसाठी शड्डू ठोकला, राजू शेट्टींकडून 'स्वाभिमानी'च्या सहा जागा जाहीर

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा पासपोर्ट तुपकर**

आम्ही दोन वर्षांपूर्वीच महाविकास सरकार सोबतचे संबंध तोडले आहेत. आघाडी सरकारमधून बाहेर पडलो, तिथून पुढे निवडणुका स्वबळावर लढवायच्या असा निर्धार आम्ही केला आहे. आगामी काळातील लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील सहा जागांवर स्वाभिमानीचे उमेदवार निवडणुक लढवतील असे निश्चित केल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सांगितले.

# आता जुन्या दस्तावेजातील मालमत्ता होणार अधिकृत

## ४० वर्षे जुन्या मालमत्ता कर, दंडात मिळणार सूट

**अरुण जोशी**

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्य शासनाने महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना जाहीर केली आहे. या योजनेत ३१ मार्च २०२४ पर्यंत ४० वर्षे जुने स्टॅम्पवरील दस्त मुद्रांक शुल्क विभागाकडे सादर करता येणार आहे. ज्या मालमत्ता स्टॅम्प नुसार मूळ मालकाकडून सुचविलेल्या मालकाच्या नावावर झाल्या नसतील तर अशा प्रकरणात कर आणि दंडावरील सूट मिळवून या मालमत्तांची नोंदणी संबंधितांना करता येणार आहे. या मालमत्तांना अधिकृत स्वरूप प्राप्त होणार आहे.नगर परिषद, नगर पंचायत, ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये घर, खुले प्लॉट अथवा शेती ही मालमत्ता मूळ मालकांकडून स्टॅम्पवर संबंधिताच्या नावाने करण्यासाठी लेख दिला जातो. मात्र, अनेकवेळा नागरिकांकडून हालेख तसाच जपून ठेवला जातो. याची नोंदच मुद्रांक शुल्क विभागाकडे केली जात नाही.



यामुळे ही मालमत्ता जरी संबंधिताला देण्याचा उल्लेख जुन्या दस्तावेजात असला तरी या मालमत्ता जुन्याच व्यक्तीच्या नावावर राहतात. त्याच्या हस्तांतरणाची प्रक्रियाच होत नाही. या मालमत्तांना विकताना जुन्या मालकाच्या नावावर मालमत्ता असल्याने प्रथम हस्तांतरण आवश्यक असते. त्या नंतरच समोरचा व्यवहार करता येतो. अथवा ज्या व्यक्तीला या मालमत्तेची जबाबदारी मिळाली त्या व्यक्तीला त्याच्या पुढील वारसाच्या नावाने मालमत्तेचे हस्तांतरण करता येत नाही. या प्रकरणात मुद्रांक शुल्क अभय योजनेने पुन्हा मालमत्ता अधिकृत करण्यासाठी संधी मिळणार आहे. यामध्ये १९८० ते ३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या स्टॅम्प पेपर असलेल्या लिखित स्वरूपाच्या मालमत्ता कर आणि दंड यामध्ये सूट मिळवून संबधितांना नावे करता येणार आहेत.

**हे दस्त असणार पात्र**

स्टॅम्प पेपर, उमट मुद्रांक, कोरलेले मुद्रांक, फ्रँकिंगच्या माध्यमातून उमटलेला ठसा, त्याच प्रमाणे ई-प्रमाणाची पावती, ईएसबीटीआय, त्याच प्रमाणे ग्रास प्रणालीद्वारे मुद्रांक शुल्क भरल्याची पावती, या प्रकरचे नोंदणी अनोंदणीकृत दस्तावेज पात्र असणार आहेत, तर, कोणत्याही मुद्रांक शुल्का शिवाय कोऱ्या कागदावर जो निष्पादित केला आहे असा कोणत्याही प्रकारचा दस्त या योजनेत स्वीकारला जाणार नाही. यासाठी मूळ दस्तावेजासह सह जिल्हा निबंधकांकडे अर्ज सादर करावा लागणार आहे.

**असा आहे २००१ चा निकष**

या योजनेत १ जानेवारी २००१ ते २०२० या दरम्यान निष्पादित दस्तमध्ये पहिल्या टप्यात १ रुपया ते २५ कोटी रकमेच्या मुद्रांक शुल्कात २५ टक्के माफी व दंडामध्ये २५ लाख अथवा २५ लाखांपेक्षा कमी दंड असेल तर ९० टक्के दंड माफ होणार आहे. दंड २५ लाखांपेक्षा जास्त असेल तर २५ लाखांवरील दंड माफ होणार आहे. २५ कोटींपेक्षा जास्त रकमेला २० टक्के मुद्रांक शुल्क माफी आणि दंड रक्कम १ कोटीपेक्षा पढील माफ असणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत २५ कोटींपर्यंत जास्त मुद्रांक शुल्कात २० टक्के मुद्रांक शुल्क माफ, दंड ५० लाखांपेक्षा कमी असेल तर ८० टक्के कपात, ५० लाखांपेक्षा जास्त मुद्रांक असेल तर ५० लाख दंड भरून वरची रक्कम माफ होणार आहे.

**अशी आहे सवलत**

१ जानेवारी २०८० ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीसाठी पहिला टप्पा असणार आहे. यासाठी १ डिसेंबर २३ ते ३१ जोनवारी २४ पर्यंत दस्त सादर करता येणार आहेत. यात १ रुपया ते १ लाख रुपयांपर्यतच्या मुद्रांक शुल्कात आणि दंडात १०० टक्के माफी मिळणार आहे. १ लाखापेक्षा अधिक रकमेसाठी मुद्रांक शुल्कात ५० टक्के आणि दंडात १०० टक्के माफी असणार आहे.

दुसरा टप्पा १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत दाखल करता येणार आहे. यात १ रुपया ते १ लाखापर्यंतच्या मुद्रांक शुल्क आणि दंडामध्ये ८० टक्के माफी असणार आहे. १ लाखापेक्षा अधिक रकमेसाठी मुद्रांक शुल्कात ४० टक्के तर दंडात ७० टक्के माफी असणार आहे.

# राज्यातील रेशन दुकानदार आजपासून बेमुदत संपावर

**दि१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यातील रेशन दुकानदार नव्या वर्षापासून बेमुदत संपावर जाणार आहेत. आज १ जानेवारी २०२४ पासून राज्यभरातील रेशन दुकानदारांचा बेमुदत संप होणार आहे. विविध प्रलंबित मागण्यांसाठी देशपातळीवरील ऑल इंडिया फेअर प्राईस शॉप डिलर्स फेडरेशनने बेमुदत संप पुकारला आहे.

राज्यातील रेशन दुकानदार नव्या वर्षापासून बेमुदत संपावर जाणार आहेत. आज १ जानेवारी २०२४ पासून राज्यभरातील रेशन दुकानदारांचा बेमुदत संप होणार आहे. विविध प्रलंबित मागण्यांसाठी देशपातळीवरील ऑल इंडिया फेअर प्राईस शॉप



डिलर्स फेडरेशनने बेमुदत संप पुकारला आहे.रेशन दुकानदारांना मार्जिन इन्कम गॅरंटी ५० हजार करा, मार्जिन मनी ३०० रुपये करा, टू जी ऐवजी फोरजी मशीन द्या, कालबाह्य नियम बदला, आनंदाचा शिधा कायमस्वरुपी राबवून कांदा, चणाडाळ, तूरडाळ, मूगडाळ या वस्तू रेशन दुकानात उपलब्ध करा यासारख्या मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तहसील कार्यालयासमोर आज रेशन दुकानदार धरणे आंदोलन करणार असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

# लोकसभा जागावाटपावरून महाविकास आघाडीचा फॉर्म्युला ठरला, सुप्रिया सुळे यांनी दिली माहिती

**दि१विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

राज्यात महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला असून केवळ शिक्कामोर्तब शिल्लक आहे, असं राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत. मुंबई- राज्यात महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला असून केवळ शिक्कामोर्तब शिल्लक आहे, असं राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत. राज्यात प्रकाश आंबेडकर यांची भूमिका महत्त्वाची असेल असंही सुळे यांनी स्पष्ट केलं. त्या माध्यमांशी बोलत होत्या.

# अमरावती लोकसभा मतदारसंघ : राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर नवनीत राणांनी निवडणूक जिंकली, आता भाजपच्या तिकिटावर उभ्या राहणार?

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

अमरावती लोकसभा मतदारसंघात सध्या अपक्ष खासदार नवनीत राणा यांचा बोलबाला आहे. मागील पाच टर्म तत्कालीन शिवसेनेच्या हातात असलेला हा बालेकिल्ला महाराष्ट्रातील सत्तांतरानंतर कोणाच्या ताब्यात जाणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. त्यामुळे यंदा या मतदारसंघात कोणात मुख्य लढत होणार याची उत्सुकता अमरावतीकरांनालागून राहिलीये. २०१९ च्या निवडणुकांमध्ये ही मुख्य लढत अपक्ष उमेदवार नवनीत राणा आणि तत्कालीन शिवसेनेचे उमेदवार आनंदराव अडसूळ यांच्यामध्ये झाली होती. सध्या आनंदराव अडसूळ हे देखील शिंदे गटात सामील झालेत. त्याचवेळी नवनीत राणा यांनी ५,०५,१३३ मतं जिंकत बाजी मारली होती. तसेच आनंदराव अडसूळ यांना ४,६८, ६८७ मतं पडली होती. नवनीत राणा या कॉंग्रेस राष्ट्रवादीकडून मैदानात उतरल्या होत्या.

अमरावती लोकसभा मतदारसंघ हा १९९१पर्यंत कॉंग्रेसचा बालेकिल्ला होता. भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील निवडून आल्यानंतर हा बालेकिल्ला कॉंग्रेसच्या हातून निसटला. त्यानंतर १९९६ मध्ये शिवसेनेचे उमेदवार अंनत गुडे, १९९८ मध्ये कॉंग्रेस आणि रिपाईचे उमेदवार रा. सु.गवई निवडून आले होते. तर पुन्हा १९९९ आणि २००४ मध्ये सेनेचे अंनत गुडे निवडून आले होते. २००९ मध्ये हा मतदारसंघ अनुसुचित जातींकरिता राखीव



ठेवण्यात आला. पण तरीही या मतदारसंघावर सेनेने आपलं वर्चस्व कायम ठेवलं आणि दोनदा आनंदराव अडसूळ हे निवडून आले. पण २०१९ च्या निवडणुकांमध्ये सेनेच्या हातून देखील हा बालेकिल्ला निसटला.

**अमरावती लोकसभा मतदारसंघामध्ये कुणाचे किती आमदार ?**

अमरावती जिल्ह्यात एकूण १४ तालुके असून एकूण सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. यामध्ये अमरावती, बडनेरा, दर्यापूर, अचलपूर, तिवसा, आणि मेळघाट या मतदासंघांचा समावेश करण्यात आलाय. दरम्यान अमरावती लोकसभा मतदारसंघ हा सध्या अनुसुचित जातींसाठी राखीव ठेवण्यात आलाय. यामधील बडनेरा विधानसभा मतदारसंघ आमदार रवी राणा, अमरावती विधानसभा मतदारसंघात कॉंग्रेसच्या विद्यमान आमदार सुलभा संजय खोडके, तिवसा विधानसभा मतदारसंघात कॉंग्रेसच्या यशोमती ठाकूर, दर्यापूर विधानसभेवर कॉंग्रेसचे बळवंत बसवंत वानखडे, मेळघाट विधानसभेवर प्रहारचे आमदार राजकुमार दयाराम पटेल आणि अचलपूर विधानसभा मतदारसंघावर प्रहाचे आमदार बच्चू कडू हे सध्या आहेत.

**नवनीत राणा भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढवणार?**

खासदार नवनीत राणा ह्या २०१९ मध्ये अमरावती लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर निवडून आल्या. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं सरकार स्थापन झालं तेव्हा नवनीत राणा आणि त्यांचे पती आमदार रवी राणा यांनी हनुमान चालीसा पठनावरुन थेट तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आवाहन दिलं. याकाळात त्यांना १४ दिवस तुरूंगात ही जावं लागलं होतं. नंतर शिंदे-फडणवीस सरकार आलं.उद्धव ठाकरे यांचं मुख्यमंत्री पद हे हनुमान चालीसाला विरोध केल्यानेच गेलं असं वारंवार नवनीत राणा यांनी त्यांच्या भाषणामध्ये अनेकदा बोलून देखील दाखवलं. त्यामुळे २०२४ च्या निवडणुकांमध्ये नवनीत राणा या भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढवण्याची दाट शक्यता निर्माण झालीये. याला कारण ही तितकंच महत्वाचं आहे.

अमरावती लोकसभेच्या विद्यमान खासदार नवनीत राणा यांचं अनुसूचित जातीचं जात वैधता प्रमाणपत्र मुंबई उच्च न्यायालयाने खोटं असल्याचं निर्णय दिला आहे. त्याच प्रकरणात नवनीत राणार यांनी लगेचच सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. सध्या या प्रकरणाचा निकाल येणं बाकी आहे. त्यामुळे नवनीत राणा यांनी भाजप कडूनच उमेदवारी घ्यावी असं भाजपच्या अनेक नेत्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना म्हटलं. म्हणून एनवेळी भाजपच्या तिकिटावर त्यांची उमेदवारी निश्चित होऊ शकते असं देखील म्हटलं जातंय.

## नवीन कायद्यामुळे ट्रॅक्टर, दुचाकी वाहन चालवणाऱ्यांनाही भिती

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

केंद्रातील मोदी सरकारने आणलेला नवीन मोटार वाहन कायदा हा वाहन चालकांसाठी अत्यंत कठोर व जुलमी आहे. या काळ्या कायद्यानुसार अपघात झाल्यास ट्रक चालकास दहा वर्षांची शिक्षा तसेच सात लाख रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. या काळ्या कायद्विरोधात वाहन चालकांमध्ये तीव्र संताप असून टँकरचालकांनी संप पुकारला आहे, या संपाला कॉंग्रेसचा पाठिंबा आहे. वाहन चालकांवर अन्याय करणारा जुलमी, अत्याचारी नवीन मोटार वाहन कायदा रद्द करावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे श्री संत गजानन महाराज भव्य पारायण सोहळा संपन्न

## ५००१ भक्तांनी केले सामूहिक परायणाचे वाचन : गण गण गणात बोते मंत्रांनी परिसर भक्तीमय

**दि.१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नवीन वर्षाच्या सुरवातीला पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथील स्वामी विवेकानंद ऑडीटोअरियम येथे श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन दिनांक १ जानेवारी २०२४ रोजी मुखोद्गत वाचक सौ विद्याताई पडवळ (मुंबई) यांच्या सुमधुर वाणीतून करण्यात आले. श्रींची पालखी काढत या सोहळ्याला सुरवात करण्यात आली सर्वप्रथम या पारायण सोहळा पालखीचे व श्रींचे पूजन संस्थेचे आधारस्तंभ माननीय श्री रामचंद्रजी पोटे पाटील , संस्थेचे अध्यक्ष आ. श्री प्रवीण पोटे पाटील , सौ अनुराधाताई प्रवीण पोटे पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील, श्रुतीताई पोटे पाटील , एडव्होकेट प्रवीण मोहोड, प्रकाशजी पुंड , सुधीर वाकोडे यांनी केले. त्यानंतर




पारायण वाचक सौ विद्याताई पडवळ यांचे शाल व श्रीफळ देऊन सन्मान व स्वागत करण्यात आले व परायणाच्या वाचनाला सुरवात करण्यात आले.


श्री गजानन स्वामी चरित, जो नियमे वाचिल सत्य, त्याचे पुरतील मनोरथ... या हेतूने अमरावती शहरासह जिल्हातील सुमारे ५००० पेक्षा जास्त गजानन महाराज भक्तांनी व महाविद्यालयातील विदयार्थ्यांनी या पारायण सोहळ्यामध्ये सहभाग घेतला सौ विद्याताई पडवळ यांच्या सुमधुर वाणीतून महाराजांना पारायण करीता आवाहन व त्यानंतर गजानन विजय ग्रंथ परायणाला सुरवात करण्यात आले. पारायणच्या सुरवातीला सर्वांना गजानन विजय ग्रंथाची तसेच पारायण दरम्यान नास्ता, चहा , पाण्याची व्यवस्था आयोजकांच्या वतीने सेवेकऱ्यांमार्फत करण्यात आली.प्रत्येक अध्यायानंतर सौ विद्याताई पडवळ यांनी श्रींचे अनुभव उपस्थित भक्तांना सांगितले , एकवीस अध्यायाच्या वाचनानंतर महाराजांची आरती , मंत्रपुष्पांजली, महाराजांची बावन्नी, महाराजांचे अष्टक, महाराजांना एकवीस नमस्कार आदींचे पठण करून उपासनेची सांगता करण्यात आली. पारायणानंतर उपस्थित सर्व भक्ताकरिता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या पारायण सोहळ्याचे यशस्वी आयोजन पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथील आशिष धाडे, पंकज मोंढे , विजय लोणकर, अनिल मलमकर , अमोल रेचे , राजेश सावरकर, धीरज भागवतकर, प्रा. प्रसाद देशमुख, प्रा. संजीवनी काळे , प्रा. नितेश चौधरी, प्रा. श्रीधर मेंढे, प्रा. मोनिका खेरडे, प्रा.शीतल नेरकर, प्रा. अजय माहोरे, प्रा. पर्णल पावडे, प्रा अक्षय पुंडकर, प्रा.सोनल निस्ताने, प्रा. नीलिमा केणे, डॉ स्नेहल अतकरे, डॉ श्रेया चिरडे, स्वाती तुपटकर, ऋषिकेश चौधरी, विवेक वैद्य, अरूनभाऊ अवसरमोहोड, राहुल भोयर, शुभम भुयार, नितेश सातारकर, राजू उईके, अमर मेटकर, यांनी केले तसेच पारायण सोहळ्याला सेवेकरी म्हणून महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.



# अयोध्या येथील विमानतळाला महर्षी वाल्मीकींचे नाव, भक्तांनी मानले सरकारचे आभार

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महर्षी वाल्मीकी यांनी रामायण ग्रंथ लिहून प्रभू श्रीरामाचा आध्यात्मिक इतिहास जगासमोर आणला आणि तो अजरामर केला. हा गौरवपूर्ण इतिहास जगासमोर भावी पिढीला प्रेरणादायी राहावा, यासाठी त्यांच्या नावाने अयोध्या येथील विमानतळ आता ओळखले जाणार आहे. शनिवारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अयोध्या येथील महर्षी वाल्मीकी यांचे नाव असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकार्पण केले. हा क्षण देशातील महर्षी वाल्मीकी भक्तांनी डोळ्यात साठवला असून,



महाराष्ट्र गुरुदेव महर्षी वाल्मीकी जयंती महोत्सव समितीच्यावतीने केंद्र सरकारचे आभार मानण्यात आले आहे.

प्रभू श्रीराम आणि गुरुदेव महर्षी वाल्मीकी यांच्यात आध्यात्मिक नाते आहे. अयोध्या येथे भव्यदिव्य प्रभू श्रीरामाचे मंदिर उभारले जात असताना १८ डिसेंबर २०२० रोजी गुरुदेव महर्षी वाल्मीकी जयंती महोत्सव समितीच्यावतीने उमेश ढोणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्राद्वारे महर्षी वाल्मीकी यांचे आश्रम आणि मंदिराच्या निर्मितीची मागणी केली होती. तसेच या मागणीची प्रत अयोध्या मंदिराचे प्रमुख महंत नृत्यगोपालदास यांनाही पाठवली होती. मात्र ही मागणी शनिवारी पंतप्रधानांनी पूर्ण केल्याबद्दल महर्षी वाल्मीकी गुरुदेव जयंती समितीच्यावतीने पंतप्रधान व केंद्र सरकारचे जाहीर आभार मानले.

या मागणीच्या पूर्ततेसाठी खासदार नवनीत राणा यांच्यासह ११ खासदारांचे शिफारस पत्र जोडून निवेदन पाठविले होते. विमानतळाला महर्षी वाल्मीकींचे नाव, आश्रमाची निर्मिती आदी क्षण गुरुदेव महर्षी वाल्मीकी भक्तांसाठी भूतो न भविष्यति असा असल्याची प्रांजळ कबुली देत मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी उमेश ढोणे, एकनाथ वावरे, प्रकाश दंदे, मीरा कोलटेके, गोपाळराव ढोणे, गजानन वानखडे, शरद खेडकर आदी महर्षी वाल्मीकी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्र शासनाच्या काळ्या कायद्याच्या विरोधात खाजगी वाहन चालक संघटनेचा हरताळ

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**

केंद्रीय गृहमंत्री ना. अमित शहा यांनी भारतीय दंड विधान कलम २७९ मधील सुचविलेली दुरुस्ती मागे घेण्याबाबत चे निवेदन तालुक्यातील खाजगी वाहन चालक संघटनेच्या वतीने अध्यक्ष एड.संतोष कोल्हे यांच्या नेतृत्वात दर्यापूर उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले त्या नुसार मा. केंद्रीय गृहमंत्री नामदार अमित शाह यांनी नुकतेच असे जाहीर केले की कोणत्याही गाडी चालकाकडून अपघात झाल्यास व तो तेथून पसार झाल्यास त्यास आजीवन कारावास करण्यात यावा,मात्र हा कायदा देशातील वाहन चालकाच्या दृष्टीने काळा कायदा असून त्या विरोधात संपूर्ण भारत देशात ड्रायव्हर युनियन द्वारे एक जानेवारी ते ३ जानेवारी २०२४ पर्यंत हरताळ पाळण्यात येत आहेत,यामुळे स्थानिक खाजगी वाहन चालक संघटना दर्यापूर ही सदर हरताळ मध्ये सामील असल्याचे ह्या निमित्ताने सांगण्यात आले ,तरी अमित शहा यांनी उपरोक्त प्रमाणे वाहन चालकाविरुद्ध केलेल्या कायद्यातील दुरुस्ती तात्काळ मागे घेण्याची घोषणा भारत सरकारने करण्यात यावी व तसे न केल्यास वाहन चालक संघटना त्या विरोधात उग्र आंदोलन करेल असा इषारा ही सदर निवेदनातून शासनास देण्यात आला. सदरनिवेदन देते वेळी स्थानिक नागरी हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष एडवोकेट संतोष कोल्हे, सचिव शरद रोहनकर व सदस्य सदस्य नागेश रायबोले, सुरज वाकपांजर, शुभम विल्हेकर तसेच खाजगी वाहन चालक संघटनेचे पदाधिकारी अनंत देशमुख ,मोहम्मद आसिफ मोहम्मद शरीफ, गजानन डाहे इत्यादी खाजगी वाहन चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.